


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर)

■ मुंबई ■ पुणे ■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ अहिल्यानगर

सांगली-कोल्हापूर ■ वर्ष : ०६ ■ अंक : २१० ■ मंगळवार, ०४ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२







# ‘भाजप’ला मतचोरीतही हिंदू-मुस्लीम दिसते?

## हर्षवर्धन सपकाळ : भाजपाच्या बुद्धीची किव करावी वाटते

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यात व केंद्रातील भाजपाचे सरकार मतचोरी करून सत्तेत आले आहे. भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी कशी केली हे लोकसभेतली विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुराव्यासह उघड केल आहे. हा प्रकार लोकशाही साठी अत्यंत घातक आहे परंतु भारतीय जनता पक्षाला यातही हिंदू- मुस्लीमच दिसते, यावरून त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते, असे प्रत्युतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मतचोरी मुद्दा सर्वात आधी काँग्रेस पक्ष व राहुल गांधी यांनी उघड केला. आता देशभरातील विरोधी पक्ष याप्रश्नी आवाज उठवत आहेत.

निवडणूक आयोगाच्या कारभारावर मोठे प्रश्नचिंन्ह उभे राहिले आहे. काँग्रेस पक्षाने हा मुद्दा सातत्याने लावून धरला आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठी येथे काँग्रेस पक्षाने प्रचंड मोठे आंदोलनही केले. मुंबईत दोन दिवसापूर्वी निघालेल्या मोर्चातही काँग्रेस पक्षाने सहभाग घेतला होता. या मोर्चावेळी काँग्रेस पक्षाचे नेते, कार्यकर्ते व झेंडेही होते पण भाजपा त्यावरही टीका करत आहे, ते चुकीचे आहे. या मोर्चात मी सहभागी होण्याचा मुद्दा गौण असून मतचोरी हा मुद्दा सर्वात महत्वाचा आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.



युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यावेळी म्हणाले की, डॉ. संपदा मुंडे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न भाजपा महायुती सरकार करत आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी हाय कोर्टाच्या न्यायमुर्तींचा सहभाग असलेली एसआयटी स्थापन करावी. भाजपाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली. सत्ताधारी पक्षाचा एक नेताच या प्रकरणात सहभागी असताना आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच चौकशीआधी रणजितसिंह नाईक निंबाळकरांना क्लिन चिट दिल्याने राज्य सरकारचे अधिकारी निष्पक्ष तपास कसा करणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

डॉ.संपदा मुंडे यांनी रणजितसिंह नाईक निंबाळकर व पोलीसांच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. हे प्रकरण काँग्रेस पक्षाने गांभिर्याने घेतले आहे. देश पातळीवर आंदोलन केले जात असून भाजपा महायुती सरकारने या प्रकरणी न्यायामूर्तींचा सहभाग असलेली एसआयटी स्थापन केली नाही तर १० नोव्हेंबला महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस वर्षा बंगल्याला घेराव घालून तीव्र आंदोलन करणार आहे. या आंदोलनातील राज्यभरातील युवक काँग्रेसचे कार्यकर्ते व तरुण सहभागी होतील असे युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीवर चर्चा करण्यात आली. युवक काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यावर चर्चा झाली.

या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनिष शर्मा, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब, प्रभारी अजय चिकारा, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, सरचिटणीस प्रविणकुमार बिरादार यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निर्वाचक गणाच्या आरक्षणात कोणताही बदल नाही : उपजिल्हाधिकारी शिंदे

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली जिल्ह्यातील ६१ निवडणूक विभाग करिता पुढील कालावधीसाठी अनुसूचित जाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व अनुसूचित जाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण प्रवर्गासाठी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीसंदर्भातील आक्षेप नामंजूर झाल्यामुळे प्रारूप निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचे आरक्षणामध्ये बदल झालेला नाही. निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचे आरक्षण दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम करण्यात येत आहे, असे उपजिल्हाधिकारी (महसूल) राजीव शिंदे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळिवले आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, राज्य निवडणूक आयोगाच्या १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार, सांगली जिल्ह्यातील ६१ निवडणूक विभागांसाठी आरक्षण सोडत १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तसेच जिल्ह्यातील १० तालुक्यांतील १२२ निर्वाचक गणांचे आरक्षण त्याच दिवशी निश्चित करण्यात आले. यानंतर १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या ७३ हरकती विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी नामंजूर केल्या आहेत. त्यामुळे आरक्षणात कोणताही फेरबदल न करता ३ नोव्हेंबर २०२५ रोजी हे आरक्षण अंतिम करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# आष्टा शहराला विश्वासानं घडवून विकासानं सजवलं

## वैभव शिंदे : आष्टा शहर विकास आघाडीच्या २०४ कोटींच्या विकास कामांचा अहवाल प्रकाशित

**सांगली : हॅलो प्रभात**

माजी आमदार स्व.विलासराव शिंदे व माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या माध्यामातुन गेली अनेक वर्ष आष्टा शहराचा सर्वांगीण विकास करीत असताना या दोन्ही नेतृत्वात २०४ कोटींची विकासकामे करीत आष्टा शहर विकास आघाडीने शहराला मोठ्या विश्वासाने घडवलं व विकासानं सजवलं असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे यांनी केले. ते कार्य अहवाल प्रकाशन सोहळयात बोलत होते.



पुढे शिंदे म्हणाले,आष्टा शहरातील जनतेने दाखविलेल्या विश्वासास पात्र राहुन आष्टा शहराचे नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी मागील काळात उत्तम काम केले. शहरातील प्रत्येक प्रभागात भरघोस निधी देण्यात आला. राजारामबापू दुधसंघाचे अध्यक्ष संग्राम फडतरे म्हणाले , माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या माध्यमातून आष्टा शहराच्या विकासाला चालना देण्यात आली. आ.जयंतराव पाटील यांच्या मंत्री व पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात आष्टा शहराला जोडणाऱ्या अनेक रस्त्यांना कोट्यावधी रुपयांचा निधी देण्यात आला.

प्रा.विशाल शिंदे म्हणाले, आष्टा शहर विकास आघाडी ही शहराच्या विकासासाठी नेहमीच कटीबध्द आहे. येणाऱ्या काळात आष्टा शहराच्या वैभवात भर पाडणारी अनेक विकासाची कामे आम्ही पुर्ण करु. यासाठी जनता आम्हाला साथ देईल. असा ठाम विश्वास आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष झुंजारराव पाटील, राजारामबापू सह. साखर कारखान्याचे संचालक रघुनाथ जाधव, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष दिलीप वग्याणी, माजी संचालक विराज शिंदे, माणिक शेळके आदी उपस्थित होते.

# तर आम्ही सामूहिक राजीनामे देऊ!

## भाजप बैठकीत पदाधिकाऱ्यांचा थेट इशारा

**पुणे : प्रकाश यादव**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष नेतृत्वाला थेट इशारा दिला आहे. जर बाहेरून उमेदवार आयात केले, तर आम्ही सामूहिक राजीनामे देऊ.



माणिकबाग येथील अनुश्री हॉलमध्ये प्रभाग क्र. ३३, ३४ आणि ३५ मधील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत कार्यकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले की,स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी अनेक वर्षे पक्षासाठी निष्ठेने काम केले आहे. अशा कार्यकर्त्यांना संधी मिळाली पाहिजे. बाहेरून उमेदवार आणले गेले, तर आम्ही गप्प बसणार नाही.

या बैठकीत उपस्थित असलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, आमच्या माथी आयात केलेले उमेदवार मारू नका, अन्यथा सामूहिक राजीनामे देऊ या भूमिकेमुळे बैठकीत वातावरण चांगलेच तापले.

बैठकीच्या सुरुवातीला आमदार भीमराव तापकीर उपस्थित नव्हते. मात्र पदाधिकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे त्यांना संपर्क करून तातडीने बोलावले. आ. तापकीर यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकले आणि सर्वांना विश्वास दिला की, भाजपमध्ये मेहनती आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनाच न्याय मिळेल. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत स्थानिक कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल.

कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. तुमच्या भावना वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवू असे आश्वासन त्यांनी दिले. खडकवासला मतदारसंघात उमेदवारी आयात करण्याच्या शक्यतेवरून भाजपच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष उसळला आहे, आणि त्याचे पडसाद येणाऱ्या निवडणूक रणधुमाळीत उमटण्याची चिन्हे दिसत आहेत.

# ॲड.असीम सरोदे यांची वकिलीची सनद निलंबीत

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यातील सामाजिक कार्यकती आणि वकील ॲड. असीम सरोदे यांना महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने मोठा धक्का दिला आहे.

राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या विरोधात केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे त्यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी निलंबीत करण्यात आली आहे.



याचबरोबर त्यांना २५,००० रुपयांचा दंड देखील ठोठावण्यात आला आहे.

एका सार्वजनिक कार्यक्रमात (ठाकरे गटाच्या 'जनता दरबार'मध्ये) त्यांनी न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात आक्षेपार्ह आणि वादग्रस्त वक्तव्ये केली होती.

ॲड.विवेकानंद घाडगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सरोदे यांची वकिलीची सनद ही तीन महिन्यांसाठी निलंबीत करण्याचा निर्णय दिला आहे. ॲड. सरोदे यांच्या वक्तव्यामुळे नागरिकांच्या मनात न्यायालयाबद्दल अविश्वास निर्माण होऊ शकतो, असे समितीने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे.

# पै.सिकंदर शेखसाठी आ.रोहित पवार मैदानात?

**पुणे : हॅलो प्रभात**

२०२४ मध्ये मानाची महाराष्ट्र केसरीची गदा पटकावणारा पैलवान सिकंदर शेख याला अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. राजस्थानमधील गुर्जर टोळीशी त्याचा संपर्क असल्याचा दावा पंजाब पोलिसांनी केला आहे. दरम्यान, सिकंदर शेखच्या कुटुंबीयांनी आपल्या मुलाला अडकवले जात असल्याचा आरोप केला.



या प्रकरणात आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उडी घेतली आहे. रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले आहे की, पै. सिकंदर शेख हा एक गुणी पैलवान असून त्याने आतापर्यंत केवळ त्याच्या गुणवत्तेवरच कुस्ती क्षेत्रात स्वतःचं असं एक स्वतंत्र स्थान निर्माण केलं. कुस्ती सोडून गुन्हेगारी क्षेत्रात तो जाईल, यावर आमचा बिलकूल विश्वास नाही, कदाचित कुस्तीमध्ये त्याची होत असलेली प्रगती पाहून कुणीतरी त्याला जाणीवपूर्वक अडकवण्याचा प्रयत्न केलेला असू शकतो.

महाराष्ट्र सरकारने पंजाब सरकारशी बोलून सिकंदरवर कोणताही अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी. अन्यथा चुकीच्या पद्धतीने त्याला अडकवल्यास लंबी रेस का घोडा असलेल्या एका मराठी पैलवानावर अन्याय करणारं ठरेल. यासंदर्भात खासदार सुप्रियाताईंच्या माध्यमातून पंजाब सरकारशी बोलण्याचा प्रयत्न सुरु असून यातून सकारात्मक मार्ग निघेल', असा विश्वासदेखील रोहित यांनी व्यक्त केला आहे. भाजप आ. प्रवीण दरेकर म्हणाले, 'या प्रकरणावर आम्ही भाष्य करण्यापेक्षा वस्तुस्थिती काय असेल याची दखल पोलिस घेतील. जर कुणी गोवण्याचा प्रयत्न केला तर एका खेळाडूला गोवू नये, अशा पद्धतीची आमची स्पष्ट भूमिका आहे.

# ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाचा शनिवारी ८ वा दीक्षांत समारंभ

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत होणार पदवी प्रदान कार्यक्रम

**पुणे : हॅलो प्रभात**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एम आयटी एडीटी), विश्वराजबाग, पुणे या विद्यापीठाचा ८वा दीक्षांत समारंभ दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वा. मोठ्या दिमाखात साजरा केला जाणार आहे.

यंदाचा समारंभ राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली, स्वामी विवेकानंद मंडप, विश्वराजबाग, लोणी काळभोर येथे संपन्न होणार आहे.

यंदा एकूण ३३३४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास भारतीय तंत्रज्ञान संस्था मंडी, हिमाचल प्रदेशचे संचालक प्रा. डॉ. लक्ष्मीधर बेहरा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच, एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून भारत सरकारच्या तंत्रज्ञान, नवोन्मेष, उष्मायन व उद्यमशीलता क्षेत्रातील राष्ट्रीय तज्ज्ञ सल्लागार परिषदेचे अध्यक्ष रामानन रामनाथन यांना विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे.



तर ‘ग्लास मॅन ऑफ इंडिया’ म्हणून परिचित आणि गोल्ड प्लस ग्लास इंडस्ट्रीजचे चेअरमन सुभाष त्यागी यांना औद्योगिक नेतृत्वाबद्दल ‘डॉक्टर ऑफ लेटर्स’ या मानद पदवीने सन्मानित केले जाणार आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठाची २०१५ साली स्थापना झाल्यापासूनची प्रगती उल्लेखनीय आहे. यंदाच्या दीक्षांत समारंभात २१ विद्यार्थ्यांना पीएच.डी., २१ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, तर १९५ विद्यार्थ्यांना रँक होल्डर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी पालक, विद्यार्थी आणि निमंत्रितांसह सुमारे ८ हजारांहून अधिक उपस्थिती अपेक्षित आहे.

आजपर्यंतच्या सात दीक्षांत समारंभांत, माजी राज्यपाल व विद्यमान उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, नितीन गडकरी, विनोद तावडे, इस्त्रोचे माजी चेअरमन पद्मविभूषण डॉ. जी. माधवन नायर, माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, डीआरडीओचे माजी चेअरमन डॉ. जी. सतीश रेड्डी, इस्त्रोचे विद्यमान चेअरमन डॉ. एस. सोमनाथ आदी मान्यवरांनी हजेरी लावली आहे.

या पत्रकार परिषदेस कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण उपस्थित होते.

**यंदा दीक्षांत समारंभात २१ पीएच.डी., २१ सुवर्णपदकांसह एकूण ३३३४ विद्यार्थ्यांना एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे, प्रा. डॉ. लक्ष्मीधर बेहरा, रामानन रामनाथन आणि सुभाष त्यागी प्रथमच विद्यापीठात येत असल्याने, विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोचली आहे.**

**• प्रा. डॉ.मंगेश कराड**

# ‘स्थानिक’साठी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय व्हावे

## ना.मकरंद पाटील ; साताऱ्यात आढावा बैठक, तालुकानिहाय घेतला आढावा

**वाई : हॅलो प्रभात**

येऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच नगर पालिकांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय होऊन कामाला सुरुवात करावी. ही निवडणूक आपल्यासाठी प्रतिष्ठेची असून जास्तीत जास्त जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचाराच्या निवडून आणण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम सुरू करावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक हॉटेल लेक व्हिव येथे मंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी आमदार सचिन पाटील, गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी, उदयसिंह पाटील, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, संजय देसाई, शिवरुपराजे खर्डेकर, प्रतापराव पवार, किसनशेठ शिंदे, सीमा जाधव, नितीन भरगुडे पाटील, प्रमोद शिंदे, मनोज देशमुख,शिवाजीराव महाडिक, मनोज पोळ, उदय कबुले, सुरेंद्र गुदगे, दत्ता नाना ढमाळ, विक्रमबाबा पाटणकर, प्रदीप विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी सर्व तालुकाध्यक्ष यांनी आपल्या कामाचा अहवाल देताना निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे सांगितले.

मंत्री ना. मकरंद पाटील म्हणाले, सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद असून आता आपण पक्षप्रवेशाच्या माध्यमातून अनेक अनुभवी नेत्यांना आपल्या सोबत घेत आहोत. आगामी काळात आणखी काही लोक आपल्या सोबत येणार आहेत. त्यामुळे पक्षाची ताकद वाढत असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आता सर्वांनी एकजुटीने कामाला सुरुवात करायला हवी जेणेकरून पक्षाच्या जास्तीत जास्त जागा निवडून येण्यास मदत होईल ज्या तालुक्यात अद्याप आपले पदाधिकारी सक्रिय झाले नाहीत त्यांनी तातडीने सक्रिय व्हावे व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी पक्षाचे ध्येयधोरणे व घेतलेले महत्वपूर्ण निर्णय लोकांपर्यंत पोहोचवावे.


प्रास्ताविकात बाळासाहेब सोळसकर यांनी पक्षाची वाटचाल आणि जिल्ह्यात सुरू असलेली पक्ष प्रवेश आणि संघटना बांधणीचा आढावा घेताना सर्वांनी निवडणुकीसाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. श्रीनिवास शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. पृथ्वीराज गोडसे यांनी आभार मानले. यावेळी किसनशेठ भिलारे, प्रवीण भिलारे, महादेव मस्कर ,सुभाष नरळे, युवराज सूर्यवंशी, प्रतिभा शिंदे, सुनील शिंदे, नासीर मुलाणी, विजयसिंह यादव उपस्थित होते.

# संपादकीय

## प्रसिद्धीची सवय फार वाईट

जीवनात प्रसिद्धी खूप महत्वाचा भाग आहे. प्रत्येकांना वाटतं की आपण प्रसिद्ध व्हावं. त्यासाठी नाना प्रकारचे कार्य केल्या जाते. आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट ठरावे, यासाठी प्रत्येकाची धडपड चालू असते. पण काही लोकं समाजात असे ही आढळून येतात की, ते प्रसिद्धीपासून चार हात दूर राहतात. तरी देखील ते एक ना एक दिवस प्रसिद्धीस येतात. कारण त्यांच्यामध्ये ती प्रतिभा असते. याउलट काही मंडळी प्रसिद्धीसाठी अधूनमधून प्रयत्न करतात. पूर्वीच्या काळी प्रसिद्ध होण्याचं एकमेव साधन म्हणजे वृत्तपत्र. वृत्तपत्रात स्वतःचे नाव प्रकाशित होऊन चार लोकांना वाचण्यास मिळणे ही फार मोठी बाब होती. कारण त्यावेळी आजच्या सारखी सोशल मीडिया नव्हती. काही मंडळी आपलं नाव आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित व्हावे म्हणून पत्राद्वारे आपली पसंद कळवायचे आणि आकाशवाणीवर नुसत्या नावाची उदघोषणा जरी झाली तरी काय आनंद व्हायचा ? चार मित्र त्यांना भेटल्यावर सांगायचे की आकाशवाणीवर आपले नाव ऐकलं होतं. प्रसिद्धीची सवय फार वाईट असते. एकदा जर त्याची सवय लागली तर माणूस त्यासाठी नाना प्रकारचे प्रयत्न करत असतो. आपलं नाव प्रसिद्धी माध्यमात कसं येईल ? याच विचारांच्या तंद्रीत राहतात. प्रसिद्धीचे वलय राजकारणी आणि चित्रपट सृष्टीतील लोकांना खूप भुरळ घालते. नेहमी प्रसिद्धीच्या वलयात राहावं म्हणून अधूनमधून अनेक घटना जाणूनबुझुन घडवून आणतात. प्रसिद्धीची सवय एक व्यसन बनते त्यावेळी मात्र एखादे दिवशी आपले नाव प्रसिद्ध झाले नाही तर मन बेचैन होते, अस्वस्थता वाढते. चांगल्या कामाची जशी प्रसिद्धी होते त्यापेक्षा जास्त खराब कामांची प्रसिद्धी फार लवकर होते. तशी प्रसिद्धी कोणालाही नको वाटते कारण त्यामुळे आपली समाजात नाचक्की होते. म्हणून माणूस चांगल्या कार्याच्या प्रसिद्धीकडे जास्तीत जास्त लक्ष देतो. आज प्रसिद्धीसाठी अनेक साधने उपलब्ध झाली असली तरी वृत्तपत्राचे स्थान किंचितही कमी झाले नाही. पेपरमध्ये आपले नाव यावं म्हणून आज ही प्रत्येकजण धडपडत असतो. राजकारणी आणि चित्रपट क्षेत्रातील मंडळीना रोजच प्रसिद्धी मिळते. मात्र सामान्य लोकांना प्रसिद्धी कशी मिळेल ? त्यासाठी मग समाजात काही चांगले कार्य करावे लागेल. तरी मीडियावाले बघतीलच याची खात्री नसते. प्रसिद्धीसाठी सुरू होतो मग नावीन्य काही करायचं खेळ. देशातल्या विविध घटना आणि घडामोडीवर आपल्या नावाचे लेख कविता लिहून पाठविणे. वृत्तपत्रात आपल्या नावाने ते प्रसिद्ध झाल्यावर आनंद होणारच. तीच जर पहिली वेळ असेल तर खूपच आनंद होणार, यात शंका नाही. मग सुरू होतो लेखन आणि प्रसिद्धी यांचा पाठशिवणीचा खेळ. लिहिलेलं साहित्य प्रसिद्ध झाला नाही की लगेच मनात न्यूनगंड निर्माण होते. यातून काही बाहेर फेकले जातात तर काही स्वतःला सावरून घेतात. आपले नाव सर्वत्र प्रसिद्ध होण्यासाठी प्रत्येकाची जी धडपड असते, त्यातूनच त्याला जीवन जगण्याची दिशा मिळते. प्रसिद्धीमधूनच एक प्रेरणा मिळत राहते आणि माणूस घडत जातो. कोणताही माणूस जन्मतः मोठा प्रसिद्ध व्यक्ती होऊच शकत नाही. त्याची सुरुवात छोट्या छोट्या घटनेतून होते. म्हणून व्यक्तीने प्रसिद्धीच्या मागे लागायला हवे पण त्यासाठी स्वैर वागणे चुकीचे आहे. आपल्या प्रसिद्धीपायी समोरच्याना त्रास होणार नाही याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. आजच्या सोशल मीडियामध्ये लोकं प्रसिद्धी मिळिवण्यासाठी कोणत्याही थराला जात आहेत.

# आद्य क्रांतिकारक दत्तोपासक वासुदेव बळवंत फडके



**हॅलो प्रभात**

**आद्य क्रांतिकारक... श्री. वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म कुलाबा, शिरढोण, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (भारत-महाराष्ट्र) येथे ४ नोव्हेंबर १८४५ रोजी झाला. कल्याण येथे प्राथमिक शिक्षण संपवून ते इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी मुंबईत आले. गिरगावातील फणसवाडी येथील जगन्नाथाचे चाळीत वास्तव्य करून त्यांनी काही काळ इंग्रजी अभ्यास केला व पुढील शिक्षणासाठी ते पुण्यास रवाना झाले.**

शिक्षणानंतर त्यांनी पुण्याच्या सैनिकी लेखानियंत्रक (कंट्रोलर ऑफ मिलिटरी अकाऊंटस) कार्यालयात सेवा केली. त्यांना त्यांच्या आजारी आईला भेटण्यास रजा मिळाली नाही. प्रश्न मनात आला जर आपणास आपल्या आईला भेटता येत नसेल तर त्या नोकरीचे मोल काय? त्यात आईचे निधन झाले व शेवटी भेट घेता आली नाही. या घटनेने आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळाली. त्याच वेळी हिंदुस्थानात भीषण दुष्काळ पडला. इंग्रज सरकारच्या हलगर्जी कारभारामुळे हजारो नागरिक मृत्युमुखी पडले. त्यामुळे इंग्रज राजवटीबाबत प्रचंड संताप त्यांचे मनात उफाळून आला व त्याचा प्रतिशोध घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. भारतमातेला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी त्यांनी सशस्त्र बंड करण्याचे ठरवले. १८५७ च्या अयशस्वी क्रांती पर्वानंतर भारतीय स्वातंत्र्याचे ध्येय स्पष्टपणे समोर ठेऊन ब्रिटिश राजवट उलथून टाकण्याचा जो सशस्त्र प्रयत्न झाला तो वासुदेव बळवंत फडके यांचे बंडच होय. त्यात त्यांना रामोशी, भिल्ल, आगरी, आणि कोळी तरुणांचा पाठिंबा मिळाला. या वीराच्या स्मरणार्थ स्मारक समिती स्थापन होऊन अनेक सामाजिक कामे केली जातात.

अव्वल इंग्रज काळातील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके हे एक थोर दत्तोपासक म्हणून प्रसिद्ध आहेत. कर्नाळ्याची किल्लेदारी फडके यांच्या घराण्याकडे होती. लहानपणापासूनच वासुदेव हूड व बंडखोर वृत्तीचा होता. कल्याण, मुंबई, पुणे येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्या वेळच्या जी. आय. पी. रेल्वेकंपनी, ग्रँट मेडिकल कॉलेज इत्यादी ठिकाणी नोकरी करणाऱ्या वासुदेवाच्या मनात इंग्रजी राजवटीविषयी तिरस्कार उत्पन्न होत होता. सत्तावनच्या युद्धाची प्रेरणा त्याच्या मनात होतीच.

पुण्याच्या फायनान्स ऑफिसात नोकरी करीत असताना त्यांच्या मनातील वैराग्यवृत्ती उसळून वर आली. मंत्रतंत्र, सत्पुरुषांच्या गाठीभेटी यांत त्यांना गोडी वाटे. अक्कलकोटच्या स्वामी समर्थांनाही ते भेटले होते. वासुदेव बळवंतांचे आराध्य दैवत श्रीदत्त हेच होते. श्रीपादवल्लभ नामक ध्यानाचे एक चित्र त्यांनी एका चित्रकाराकडून मुद्दाम काढवून घेतले होते. दत्ताचे हे रौद्र दर्शन त्यांच्या बंडखोर मनाला प्रेरणा देई. त्याची नित्य ते पूजा करीत. रोज ते श्रीगुरुचरित्राच्या पोथीचा अध्याय वाचीत. दत्तांच्या आराधनेचा व उपासनेचा एक ग्रंथ 'दत्त महात्म्य' नावाचा प्रसिद्ध करण्याचा त्यांना मानस होता. गंगाधरशास्त्री दातार यांच्याकडून 'दत्तलहरी' या स्तोत्राचे भाषांतर करवून वासुदेव बळवंतांनी प्रसिद्ध केले होते.



## ४ नोव्हेंबर : वासुदेव बळवंत फडके जन्मदिन

रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात जन्मलेल्या फडक्यांचे आजोबा नजीकच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच फडक्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले. माध्यमिक शिक्षण संपल्यावर ते पुण्याला आले व सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा सेवेत भरती झाले. येथे असताना त्यांच्यावर महादेव गोविंद रानड्यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे होती असे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेंच्याही प्रभावात होते. साळव्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सामील करून घेणे महत्त्वाचे असल्याचे फडक्यांना पटवून दिले. वासुदेव बळवंत फडके हे पुण्यातल्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे पहिले सेक्रेटरी आणि ट्रेझरर होते. १८७३ मध्ये स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेतली. तसेच समाजामध्ये समानता, ऐक्य, समन्वय निर्माण करण्यासाठी 'ऐक्यवर्धिनी संस्था' सुरू केली. त्यांनी पुण्यामध्ये १८७४ मध्ये 'पुना नेटिव्ह इन्स्टिट्युशन' ही शाळा सुरू करून स्वदेशीचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केला. ते दत्त उपासकही होते. त्यांनी 'दत्तमहात्म्य' हा सात हजार ओव्यांचा ग्रंथही लिहिला आहे.

'दधिची ऋषींनी आपल्या अस्थीही देवांसाठी दिल्या. हिंदवासियांनो, मी आपला प्राण तुमच्यासाठी का देऊ नये?' अशी त्यांची वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्या देशसेवेस त्रिवार वंदन करून अध्यात्मिक जीवनास परिपूर्ण म्हणता येईल. त्यांनी राष्ट्रकार्य अध्यात्मिक जीवनाने परिपूर्ण केले.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या वीरश्रेष्ठाला राजद्रोहाखाली काळ्या पाण्याची तसेच हद्दपारीची शिक्षा झाली. शिक्षा होऊन एडन येथील तुरूंगात डांबून रहावे लागले होते. त्यांचा मुक्त आत्मा रोगांनी जर्जर झालेल्या शरिरात तडफड करीत होता. त्याआधी दोन वर्षांपूर्वीच तूरूंगातून पळून जाण्याचा धाडसी प्रयत्न वासुदेव बळवंतांनी केला होता. त्यामुळे सरकारने त्यांच्यावर अधिकची बंधने घातली होती. त्यामुळे त्यांचे जीवन अधिक कष्टदायक झाले होते. मन व शरिर खंगून गेल्याने उत्साह पार मावळला होता. दुर्धर अशा क्षयरोगाने त्यांना पछाडले होते. तेथील अधिकारी त्यावेळी फलटण येथील डॉ. बर्वे हे होते. ओळखीचे, जवळचे आणि मायेचे एकच व्यक्ती म्हणजे डॉ. बर्वे. वासुदेव बळवंतांना आता फक्त मृत्यूची आशा राहिली होती. घरदार शेकडो मैलांवर राहिले होते. मृत्यूची वाटचाल करणारे वासुदेव इंग्रज सरकारवर मनातून चरफडत होते आणि माघ शुद्ध एकादशी (शके १८०४) चा दिवस उजाडला आणि त्यांच्या अंगातील ताप वाढला. अखेरची घटका जवळ आली आणि सायंकाळी साडेचारच्या सुमारास आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत यांचे एडन येथील कारागृहात जन्मठेप भोगत असताना १७ फेब्रुवारी १८८३ रोजी निधन झाले.

## फेडएक्सने ग्लोबल इकॉनॉमिक इम्पॅक्ट रिपोर्ट केला सादर

**मुंबई : हॅलो प्रभात**

फेडएक्स कॉर्प.ने आपला वार्षिक ग्लोबल इकॉनॉमिक इम्पॅक्ट रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे, ज्यामध्ये कंपनीच्या जागतिक नेटवर्कचा आणि २०२५ वित्तीय वर्षातील नवोन्मेषाला चालना देणाऱ्या भूमिकेचा उल्लेख करण्यात आला आहे.

डन अँड ब्रॅडस्ट्रीट या व्यवसायविषयक डेटा आणि विश्लेषण क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या अभ्यासात फेडएक्सचा व्यक्ती, उद्योग आणि समाजांवर झालेला सकारात्मक परिणाम म्हणजेच 'फेडएक्स इफ`क्ट' अधोरेखित करण्यात आला आहे.

## कुंडल जिल्हा परिषद गटात दिपक लाड ठरणार जायंट किलर

### रणसंग्राम हाच जनतेचा पर्याय

**पलूस : हॅलो प्रभात**

कुंडल (ता.पलुस) जिल्हा परिषद गटांमध्ये रणसंग्राम सोशल फाउंडेशन रिंगणात उतरणार असल्याने प्रस्थापित विरुद्ध जनसामान्य जनता असा मुकाबला रंगणार आहे. रणसंग्राम सोशल फाउंडेशन ने कुंडल गावची स्वाभिमानी क्रांतिकारी पुरोगामी व परिवर्तनवादी मोठी ओळख जिवंत ठेवण्यासाठी सामाजिक कामाच्या भरवशावर मागील ग्रामपंचायतची निवडणूक लढवली होती.

मागील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत रणसंग्राम सोशल फाउंडेशनच्या उमेदवारांनी प्रस्थापित दोन्हीही गटांना घाम फोडला होता. या निवडणुकीत प्रमुख दोन्ही गटासोबत भारतीय जनता पार्टी देखील रिंगणात होती.

भारतीय जनता पार्टीचे पूर्ण पॅनल १७ + १ सरपंच असे उमेदवार रिंगणात उतरले असताना देखील रणसंग्राम च्या ८ उमेदवारांना भारतीय जनता पार्टी या मोठ्या राजकीय पार्टी पेक्षा दुप्पट मते कुंडलकरांनी दिली होती. पहिल्याच निवडणुकीतील रणसंग्रामची म तांची आकडेवारी प्रस्थापित नेत्यांना विचार करायला भाग पाडणारी ठरली आहे. या निवडणुकीत प्रथम क्रमांकावर राष्ट्रवादी दोन नंबर वर काँग्रेस तीन नंबर रणसंग्राम व चार नंबर भारतीय जनता पार्टी असे मतांचे विभाजन झाले होते.



ग्रामपंचायत निवडणुकीत रणसंग्रामने मागील १५ वर्षापासून केलेल्या सामाजिक कार्याचे जाहीरनामा पुस्तक.. रणसंग्राम ची अभिनव प्रचार पद्धती हे चर्चे चा विषय ठरले. रणसंग्राम सोशल फाउंडेशनने हे सामान्य कुटुंबातील गोरगरीब तरुणांना संघटित करून त्यांना प्रस्थापित व्यवस्थेमध्ये नेतृत्व देत आहे. रणसंग्राम च्या माध्यमातून आजवर कुंडल आणि परिसरामध्ये विविध नाविन्यपूर्ण सामाजिक भूमिका घेऊन जनसामान्य जनतेला न्याय दिला आहे. कराड- तासगाव नवीन रस्ता, महत्वपूर्ण मोफत कोविड सेंटर मध्ये ५०० पेक्षा जास्त रुग्णांना अनमोल सेवा, रुग्णसेवा, मोफत रक्त सेवा, आरोग्य शिबिरे, जन आंदोलने, बेघर आंदोलन, व्याख्यानमाला, प्रबोधन माला, नवीन वसाहतीमध्ये प्रलंबित वीज प्रश्न, शेतकऱ्यांचा वीज प्रश्न, भव्य आणि दिव्य क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम. कुंडल गावची परंपरा टिकवण्यासाठी विविध उपक्रम पुरस्कार वितरण सोहळे.

राज्यभरातील अनेक मान्यवरांच्या माध्यमातून कुंडल परिसरामध्ये नवीन पिढीला मार्गदर्शन लवकरच या कामाचे स्मरण करण्यात येणार असल्याचे रणसंग्राम सोशल फाउंडेशन करून कळवण्यात आले. कुंडल जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये प्रस्थापित पक्षांच्याकडे नेते सोडले तरी उमेदवारिसाठी सक्षम म्हणून चेहरा नाही ही दुर्दैवी अवस्था आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी नेत्यांनी लादलेला चेहरा किंवा निवडणूक आल्यानंतर जागे होणारे इच्छुक चेहरे आणि समाजकार्यातील क्रियाशील जनतेच्या मनातला चेहरा या मुद्द्यांचा विचार करून स्वाभिमानी स्वातंत्र्यप्रिय कुंडलकर जनता निवडणुकीला सामोरे जाणार आहे.

रणसंग्राम सोशल फाउंडेशन कुंडल जिल्हा परिषद गटातील प्रत्येकगावातसामाजिककार्याच्या निमित्ताने घरोघरी,व्यक्तिगत पातळीवर तसेच नागरिक,तरुण व माता- भगिनींच्या मध्ये जास्तीत जास्त स्नेह संबंध जोडून आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूकी मध्ये रणसंग्राम चे अँड.दिपक लाड जायंट किलर ठरेल इतिहास घडवेल असे मत जानकारांनी मांडले आहे.

## भावे नाट्य मंदिरात 'लोककला महोत्सव' स्पर्धा

### बालरंगभूमी परिषद, मुंबई आणि सांगली शाखेचे आयोजन

**सांगली : हॅलो प्रभात**

बालरंगभूमी परिषद, मुंबई आणि बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोककला महोत्सव' या स्पर्धेचे आयोजन २१ नोव्हेंबर २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्य मंदिर, सांगली येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला, नृत्य, गायन आणि वादन यांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने हा महोत्सव दरवर्षी घेतला जातो. परिषद अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील २७ शाखांमधून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. ही स्पर्धा वय वर्षे ६ ते १५ वयोगटातील बालकलाकारांसाठी असून, एकल आणि सांघिक अशा दोन प्रकारांत पार पडणार आहे.

एकल विभागात गीत, नृत्य, वाद्यवादन तर समूह विभागात समूह नृत्य व गीताचे सादरीकरण करण्यात येईल. स्पर्धा सहभाग पूर्णपणे मोफत असून जिल्ह्यातील शाळा व संस्था यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन अध्यक्ष नितीन खाडीलकर यांनी केले आहे. नोंदणीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रमुख कार्यवाह सचिन खुरपे यांनी केले. कविता बागलकोटे : ९६०४५ ६११६९, विजय कुलकर्णी : ९०२८० ९६९८८, वर्षा लिमये : ८०५०० ९८८८५, नंदकिशोर लिमये : ७७७४० ९७८८५

## संस्कार चौगुलेचा विभागीय क्रीडा स्पर्धेत डंका

**जत : हॅलो प्रभात**



रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत राजे रामराव महाविद्यालय, जतचा खेळाडू संस्कार बापूसाहेब चौगुले याने दमदार कामगिरी करत ८०० मीटर आणि १५०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने डेरवण (ता. चिपळूण) येथील एस.व्ही.जे.सी.टी. क्रीडा संकुलात पार पडली. संस्कार चौगुलेच्या या यशामुळे त्याची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी कॅ. प्रा. पांडुरंग सावंत, प्रा. अभिजीत चव्हाण, प्रा. अनुप मुळे, प्रा. दीपक कांबळे यांनी संस्कारचे अभिनंदन करून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## 'स्मार्ट सुनबाई'चा ट्रेलर प्रदर्शित

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'स्मार्ट सुनबाई' या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. आकर्षक दृश्यरचना, प्रभावी संवाद आणि नात्यांच्या गुंतागुंतीतून उलगडणारी कथा या ट्रेलरमधून झळकते. सण-उत्सवांच्या रंगांनी सजलेलं वातावरण, रहस्याची झलक, कौटुंबिक विनोद आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली ही कथा प्रेक्षकांना हसवते तर कधी विचार करायला लावते. या ट्रेलरचं लाँच बगलामुखी देवी मंदिर, नलखेडा, मध्यप्रदेश येथे प्रदर्शित करण्यात आला.

## 'नतमस्तक' चित्रपटाची पोस्टर लाँचद्वारे घोषणा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

नुकतीच घोषणा करण्यात आलेला 'नतमस्तक' हा मराठी चित्रपट याच वाटेवरील पुढचे पाऊल आहे. या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळेल याची उत्सुकता वाढविण्याचे काम पोस्टर करीत आहे. निर्माते रमेश शिंदे यांनी आर. एस. गोल्डन ग्रुप मुव्ही मेकर्सच्या बॅनरखाली चित्रपटाची निर्मिती केली आहे. रमेश शिंदे यांची ही पहिलीच चित्रपट निर्मिती आहे. रमेश शिंदे हे पुण्यातील यशस्वी उद्योजक असून सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. पहिले वहिले पोस्टर लाँच करून चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. हा चित्रपट पुढल्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

## किया इंडियाची सर्वोत्तम मासिक विक्री

**मुंबई : हॅलो प्रभात**

'ऐतिहासिक टप्प्याची घोषणा करत किया इंडियाने भारतातील बाजारपेठेत प्रवेश केल्यापासून ऑक्टोबर २०२५ मध्ये सर्वोत्तम मासिक विक्री कामगिरी संपादित केली. ऑक्टोबर २०२४ मध्ये करण्यात आलेल्या २२,३७५ युनिट्सच्या विक्रीच्या तुलनेत वार्षिक टक्क्यांची प्रबळ वाढ अनपेक्षित विक्री टप्पा ठरला. या यशामधून भारतातील स्पर्धात्मक ऑटोमोटिव्ह क्षेत्रात कियाची शक्तिशाली आणि शाश्वत गती दिसून येते.

## अदाणी टोटल गॅस - Q2 d H1FY26 निकाल जाहीर

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अदानी टोटल गॅस लि. कंपनी देशातील ऊर्जा क्षेत्रात व्यापक पायाभूत सुविधांच्या विस्ताराद्वारे परिवर्तन घडवत आहे. कंपनीन ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवार्षिक कालावधीसाठी आपली कार्यात्मक, पायाभूत आणि आर्थिक कामगिरी जाहीर केली. ATGL ने वार्षिक तुलनेत १६% वॉल्यूम वाढ, २०% महसूल वाढ आणि ६०३ कोटींचा EBITDA नोंदवला आहे. ही मजबूत कामगिरी अशा काळात साध्य झाली आहे, जेव्हा APM आणि NWG गॅस पुरवठा एकत्रितपणे H1 FY25 मधील ७०% वरून H1 FY26 मध्ये ५९% पर्यंत घटला, तसेच अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ४% ने अवमूल्यन झाल्याने गॅस खर्चात वाढ झाली. ATGL ने आपल्या पायाभूत सुविधांचा विस्तार सातत्याने चालू ठेवला आहे .

## 'ज्ञान-भारतम'शी भांडारकर संस्थेचा महत्वपूर्ण करार

**पुणे : हॅलो प्रभात**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात उद्घाटन केलेल्या ज्ञान-भारत मिशनशी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचा सामंजस्य करार नुकताच दिल्ली येथे संपन्न झाला. केंद्र सरकारच्या संस्कृति-मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्ली येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमामध्ये या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हा करार पाच वर्षांचा असून त्याद्वारे भांडारकर संस्थेला ज्ञान-भारतमब मिशनमध्ये क्लस्टर सेंटरचा दर्जा देण्यात आलेला आहे. केंद्रीय संस्कृति-मंत्रालयाच्या वतीने सहसचिव समर नंदा आणि भांडारकर संस्थेच्या वतीने नियामक परिषदेचे सदस्य मनोज एरंडे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. संस्थेचे निबंधक डॉ. श्रीनन्द बापट हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर







# पालिका पथविभागाची खड्डेमुक्त अभियान मोहीम

**पुणे : सोमनाथ साळुंके**

पालिका पथविभागाच्या वतीने खड्डेमुक्त अभियान मोहीम हाती घेण्यात आली असून नुकतेच या विभागाच्या वतीने पूर्व हवेली भागातील खराडी, वडगाव शेरी परिसरातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची पाहणी केली असून बिकट झालेल्या रस्त्यांची लवकरच दुरुस्ती करण्यास गती देण्यात येणार आहे.

गेल्या पाच ते सहा महिन्यापासून पुणे शहरासह उपनगर भागाला मुसळधार पावसाने झोडपल्याने शहरातील विविध परिसरात यामुळे सदृश्य पूरपरिस्थिती झाल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असतानाच शहरातील नागरिकांना झालेल्या पूरपरिस्थितीमुळे अनेक अडचणींना सामोरे जाण्याची वेळ आली.त्यातच सततच्या पडणाऱ्या पावसाने अनेक रस्त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त होऊन काही ठिकाणी रस्त्यांना खड्डे पडून त्यामध्ये पावसाचे पाणी साचून राहत असल्याने खड्डे रस्त्यात की,रस्ते खड्ड्यात अशी परिस्थिती झाल्याने पडलेल्या खड्ड्यांचा अंदाज वाहन चालकांना येत नसल्याने दिवसेदिवस छोट्या मोठ्या अपघाताच्या घटनेत वाढ झाली होती.त्यामुळे पालिकेच्या कामकाजाबाबत नागरिकांमध्ये शंका उपस्थित होऊन नाराजीचे सूर उमटले होते.

महिनाभरापूर्वी उपनगर भागात विकासकामांचा आढावा घेण्यासाठी व

## पथविभागाची खराडी, वडगाव शेरी भागात पाहणी



नागरिकांची मुख्य समस्या जाणून घेण्यासाठी पालिकेचे नवनिर्वाचित आयुक्त राम किशोर नवल यांनी स्वतः पूर्व हवेली भागातील येरवडा,वडगाव शेरी,खराडी,वाघोली आदी भागांची पाहणी करून त्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मुख्य समस्या सोडविण्याचे आदेश पालिका पदाधिकारी यांच्या बैठक घेऊन सोडविण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार सोमवार (दि.३) रोजी पालिका पथविभागाच्या पथकातील वरिष्ठ,कनिष्ठ अधिकाऱ्यांनी जुना मुंढवा रोड परिसरातील साईनाथनगर, मारुतीनगर,सूर्योद्यनगर,गणेशनगर, टाटा गार्डन यासह खराडी परिसरातील राघोबानगर, चंदननगर-हडपसर बायपास मार्ग, थिटे वस्ती आदी भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची पाहणी केली.

यावेळी पालिका पथ विभागाच्या पथकाने ज्या ठिकाणी खड्डेमय रस्ते झाले आहेत.त्यांची प्रथम पाहणी करून या रस्त्यांची लवकरात-लवकरदुरुस्ती करण्यात येणार आहे.


पालिका अधिकाऱ्यांनी या भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची पाहणी करून ते तात्काळ दुरुस्त करण्यात येणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून येत आहे.

यामुळे खड्ड्यांमुळे नेहमीच होणाऱ्या अपघातातून वाहनचालकांची मुक्तता होणार आहे.यामुळे नेहमीच खड्ड्यांमुळे त्रस्त झालेले वाहनचालक देखील रस्ते दुरुस्त झाल्यावर मोकळा श्वास घेणार आहेत.

> पालिका आयुक्तांच्या आदेशानुसार वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील विविध भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची पाहणी केली असून पावसाने नुकतीच विश्रांती घेतल्याने या कामाला प्रथम प्राधान्य देऊन ते दुरुस्त करण्याला गती देणार आहे.
>
> **– सायली सूर्यवंशी,उपअभियंता**

# दिक्षा दिवसा निमित्त रुकडी येथे विविध कार्यक्रम

**रुकडी : हॅलो प्रभात**



रुकडी (ता.हातकणंगले) येथील दिगंबर जैन समाजाच्या वतीने प. पु १०८ मुनीश्री जयंत सागरजी महाराज यांच्या दिक्षा दिवसा निमित्त दि. ५ व ६ नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रम होणार असुन सर्व श्रावक श्रविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष रवींद्र डिग्रजे यांनी केले आहे.

प. पु.चर्या शिरोमणी पट्टाचार्य श्री. १०८ विशुद्ध सागरजी महाराज यांचे शिष्य प.पु. १०८ मुनीश्री जयंत सागरजी महाराज यांच्या तृतीय दिक्षा दिवसा निमित्त ५ नोव्हेंबर रोजी श्री १००८ भगवान महावीर मनोकामना सिद्धी विधान होणार असुन या दिवशी सकाळी ७ वाजता मंगलाचरण , ७:३० वाजता पंचामृत अभिषेक , ८ वाजता नित्य पूजा , ९ वाजता मुनीश्रींचे प्रवचन , १० वाजता विधान प्रारंभ , १२ वाजता विधान विसर्जन , दुपारी ३:३० वाजता मुनिश्रींचे मंगल प्रवचन दि. ६ नोव्हेंबर रोजी श्री. लघु गनधर वलय महामंडल विधान होणार असुन सकाळी ६:३० वाजता मंगला चरण, ७ वाजता पंचामृत अभिषेक , ७:३० वाजता नित्य पूजा , ८:३० वाजता मंगल प्रवचन , ९:३० वाजता विधान प्रारंभ , ११:३० वाजता मंगल आरती व विधान विसर्जन तर दुपारी २ वाजता प. पु.मुनीश्री १०८ जयंत सागरजी महाराज यांचा दिक्षा दिन सोहळा कार्यक्रम शततारका लॉन्स येथे प.पु मुनीश्री १०८ सारस्वत सागरजी महाराज व मुनीश्री १०८ सिद्ध सागरजी महाराज यांच्या पावन सानिध्यात तसेच नांदणी मठाचे जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी व कोल्हापूर मठाचे लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असुन गुरु पूजा , शास्त्र भेट , जप माळ भेट व दुपारी ३:३० वाजता मुनिश्रींचे प्रवचन आदी कार्यक्रम होणार आहेत सदर विधी विधान विधानाचार्य रोहित पंडित ( क.डिग्रज ) व स्थानिक पंडित सुनील उपाध्ये यांच्या मार्गदर्शना खाली होणार आहेत तरी याचा पुण्य लाभ सर्व श्रावक श्राविकांनी उपस्थित राहून घ्यावा असे आवाहन रवींद्र डिग्रजे यांनी पत्रकार परिषदेत केले आहे. या वेळी वीर सेवा दलाचे संघनायक सनी पाटील , वीर महिला मंडळाच्या संघनायिक शोभा मगदूम , महावीर तरुण मंडळाचे अध्यक्ष हर्षवर्धन कापसे आदी उपस्थित होते.

# 'राष्ट्रवादी'चा १० नोव्हेंबरला कार्यकर्त्यांचा मेळावा

## रणधीर नाईक : मेळाव्यात निवडणुकीचा श्री गणेशा होणार

**शिराळा : हॅलो प्रभात**



राष्ट्रवादी (अजितदादा पवार गट) शिराळा विधानसभा मतदारसंघातील नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती व सत्कार समारंभ तसेच सर्व कार्यकर्त्यांचा मेळावा सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता इंदिरा पॅलेस मंगल कार्यालय, वाघवाडी (ता. वाळवा) येथे आयोजित करण्यात आला असलेली माहिती सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी दिली श्री. नाईक पुढे म्हणाले,या मेळाव्याला राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक, जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील, आ.इद्रिसभाई नायकवडी, माजी राज्यमंत्री माजी आमदार अजितराव घोरपडे, माजी आमदार विलासराव जगताप, राजेंद्रअण्णा देशमुख तसेच जिल्ह्यातील पक्षाचे इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या निमित्ताने जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपंचायतीच्या निवडणुकीचा श्री गणेशा करण्यात येणार असून, आगामी निवडणुकांचे नियोजन आणि नूतन पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्याचे काम या मेळाव्यामध्ये होणार आहे. मा. शिवाजीराव नाईक साहेबांच्या नेतृत्वाखाली शिराळा व वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी चिवटपणे संघटना टिकवून ठेवली असून, आता मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या निवडणुका ताकदीने लढवून पक्षाची ताकद दाखविण्याचा निर्धार करण्यात आला आहे.या मेळाव्यास शिराळा विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रणधीर नाईक यांनी यावेळी केले.

# टाकळी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रवींद्र मोहिते

**मिरज : हॅलो प्रभात**

आ.डॉ. सुरेशभाऊ खाडे यांच्या नेतृत्वाखालील टाकळी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रवींद्र मोहिते यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी किरण बंडगर, आगस्ट कोरे, अभिजीत पाटील, अनिल शिरसाठ, मुसा गोदड, सौ.कल्पना कदम, प्रविण कोरे, सौ.अश्विन भोसले, सौ.रुपाली लोखंडे, पंकज शिंदे, सुभाष भंडारे, राजू भंडा, परसराम आवळे, प्रसाद आवळे मानतेस तंगडी सचिन पाटील सुखदेव पाटील यावेळी आमदार सुरेश भाऊ खाडे साहेब यांच्या हस्ते रवींद्र मोहिते यांचा सत्कार करण्यात आला.

# साळवाडी-भोगावरस्ता बनला मृत्यूचा सापळा

## तात्काळ दुरुस्तीची मनसेची मागणी

**पन्हाळा : हॅलो प्रभात**



साळवाडी ते बाजार भोगाव हा चार किलोमीटरचा मुख्य रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी पोखरला असून प्रवास जीवघेणा ठरत आहे. ऊस वाहतूक सुरू असल्याने अवजड वाहनांना मोठा धोका निर्माण झाला आहे. मनसे महाराष्ट्र सैनिक संघटनेचे रविंद्र पाटील यांनी सांगितले की, हा रस्ता असंख्य गावांना जोडतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ डांबरीकरण न केल्यास मनसे रस्त्यावर उतरेल. ग्रामस्थांनीही 'रस्ता द्या, नाहीतर आंदोलन ठरलेच,असा इशारा दिला आहे.

# वत्सलादेवी विद्यालयाचा कबड्डीमध्ये डंका

## दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी केले कौतुक

**सांगोला : विकास गंगणे**

कै. सौ. वत्सलादेवी देसाई विद्यालय व कै. अण्णासाहेब घुले-सरकार कनिष्ठ महाविद्यालय, जवळा (ता. सांगोला) या शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या विजयाची परंपरा कायम ठेवत संपूर्ण सोला-पूर जिल्ह्यात जवळा विद्यालयाचा झेंडा उंचावला आहे.

१७ वर्षे वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने आणि मुलांच्या कबड्डी संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत आपला दणदणीत विजय नोंदवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही संघांनी आपल्या झुंजार खेळ, संघभावना आणि अथक परिश्रमांच्या जोरावर विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवण्याचा मान



मिळवला.ही स्पर्धा अतिशय अतितटीची झाली होती, परंतु जवळा विद्यालयाच्या खेळाडूंनी आपल्या उत्तुंग जिद्द, चपळाई आणि खेळाडूवृत्तीच्या बळावर सर्व प्रतिस्पर्धी संघांना पराभूत करत विजय मिळवला. मैदानावर मुला-मुलींचा उत्साह, शिस्त, आणि संघटित खेळ पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या खेळाने केवळ विजयच नव्हे तर जवळा विद्यालय या नावाला नवे तेज प्राप्त झाले आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यालयाचे क्रीडाशिक्षक विजय चडचणकर, अशोक पाटील, विजय लांडगे तसेच मार्गदर्शक कोच पंकज गव्हाणे व सचिन चव्हाण यांचे विशेष कौतुक करण्यात आले. खेळाडूंना उत्तम मार्गदर्शन व प्रेरणा देऊन त्यांनी संघाला विजयाकडे नेले.

# पहाट उपक्रमांतर्गत भोई समाजाला मच्छीजाळींचे वाटप

**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**



समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पहाट' उपक्रमांतर्गत श्री श्रम प्रतिष्ठा एग्रीकल्चर लाईफस्टाईल डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या सहकार्याने भोई समाजातील ६५ कुटुंबांना प्रत्येकी दोन अशा एकूण १३० मच्छीजाळींचे वाटप पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, समाजातील पारधी व भोई यांसारख्या घटकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व सुविधा मिळावी, त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात आणि गुन्हेगारी मार्गाकडे वळण्याऐवजी सन्माननीय जीवन जगता यावे, हा 'पहाट' उपक्रमाचा उद्देश आहे.

मागील महिन्यात भीमानगर येथील पारधी वस्तीला भेट देताना भोई समाजाची व्यथा पोलिस अधीक्षकांना समजली होती. महापुरामुळे त्यांच्या मच्छीमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या जाळ्या वाहून गेल्याने त्यांची उपजीविका कोलमडली होती. या पार्श्वभूमीवर श्री श्रम प्रतिष्ठा फाउंडेशनच्या माध्यमातून जाळ्यांचे वाटप करून त्यांना नवी उभारी देण्यात आली.या कार्यक्रमास करमाळा उपविभागीय पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, पोलीस निरीक्षक नारायण पवार तसेच पोलिस विभागातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भटक्या कुत्र्यांची लसीकरण मोहीम लवकरच सुरू

## छत्रपती ग्रुपच्या प्रयत्नांना यश



**हुपरी : हॅलो प्रभात**

हुपरी नगरपरिषद स्थापनेनंतर प्रथमच शहरात भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले गेले आहे. छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाने संपर्कप्रमुख, सौरभ खोत यांनी सुरू केलेल्या पाठपुराव्या मुळे प्रलंबित असलेल्या भटक्या कुत्र्याच्या विषयाला अखेर प्रशासकीय लढ्याला मोठे यश मिळाले आहे.

हुपरी नगरपरिषदेने अखेर शहरातील भटक्या कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण आणि रेबीज प्रतिबंधक करण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम अधिकृतपणे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कामाची 'वर्क ऑर्डर' देखील निघाली आहे. हा 'ऐतिहासिक निर्णय' हुपरी शहरवासीयांसाठी भयमुक्त आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. हा महत्त्वाकांक्षी उपक्रम यशस्वी करण्यासाठी हुपरी शहरातील नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे.हुपरी शहर सुरक्षित आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती ग्रुपने केले आहे.

# 'विवेकानंद'च्या कविन केंगनाळकर पॅरा-शूटिंगस्पर्धेत यश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




विवेकानंद कॉलेज इयत्ता ११ वी चा विद्यार्थी कविन केंगनाळकर याने अल ऐन (यूएई) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा-शूटिंग स्पर्धेत १० मीटर एअर रायफल सांघिक गटात पहिले पदक जिंकून कोल्हापूर आणि भारताचा गौरव वाढवला आहे.

कविनच्या यशामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रशिक्षक जीवन राय आणि जयप्रकाश नौटियाल यांचे मार्गदर्शन लाभले.

# कौस्तुभ गावडे यांच्या विजयासाठी जीवाचे रान करू : श्रीराम साळुंखे

## शिक्षक मतदार नोंदणी सहविचार सभेत शिक्षकांचा निर्धार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिक्षकांच्या सर्वांगीण प्रश्नांची जाण असणारा आपला हक्काचा शिक्षक आमदार विधान परिषदेत पोहोचविण्याची वेळ आता आली आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा लाभलेले कौस्तुभ गावडे हेच शिक्षक समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या विजयासाठी आम्ही जीवाचे रान करू, असा ठाम निर्धार पुणे विभाग प्रचारप्रमुख श्रीराम साळुंखे यांनी व्यक्त केला.



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, कोल्हापूर येथे पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणीसाठी आयोजित सहविचार सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था होते. प्रचारप्रमुख श्रीराम साळुंखे म्हणाले, विकसित समाजनिर्मितीमध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे शिक्षकांचे प्रश्न जाणणारा, शिक्षकांच्या हक्कासाठी लढणारा आमदार विधान परिषदेत पोहोचला पाहिजे. ६ नोव्हेंबरपर्यंत सुरू असलेल्या मतदार नोंदणी मोहिमेत जास्तीत जास्त शिक्षकांनी नावे नोंदवून गावडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करावे.

सभेला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक मतदार नोंदणीचे जिल्हा व तालुकाप्रमुख, बुथप्रमुख तसेच शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारत विश्र् पातळीवर ६ जी क्रांतीचे नेतृत्व करेल : डॉ. रामजी प्रसाद

## अशोकराव माने इन्स्टिट्यूटमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**घुणकी : हॅलो प्रभात**

युवकांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या प्रवाहाची दिशा ओळखून आपली तयारी सुरू केली पाहिजे. संशोधन, नवोन्मेष आणि प्रयोगशीलतेकडे लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज आहे. ६जी च्या क्षेत्रात भारताने आघाडी घ्यावी, यासाठी तरुण संशोधकांनी आपल्या करिअरची दिशा नव्या तंत्रज्ञानाकडे वळवावी. युवकांमध्ये असलेली ऊर्जा, सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्य यांचा उपयोग योग्य दिशेने झाला तर भारत जागतिक पातळीवर ६जी क्रांतीचे नेतृत्व करू शकेल, असे मत डेन्मार्क येथील अलबर्ग युनिव्हर्सिटीमधील सेंटर फॉर टेलीइन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक व कोअर टेलीइन्फ्रास्ट्रक्चर ग्लोबल कॅन्सूलचे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ. रामजी प्रसाद यांनी व्यक्त केले. ते




अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या वतीने इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसर्च अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या परिषदेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे, ग्रेटर नोएडा येथील शारदा युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. सिबाराम खारा, नवी दिल्ली येथील साऊथ एशियन युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. के. के. अग्रवाल आणि येनीएआय कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रमन बत्रा, रवी डोली आदी प्रमुख उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, उद्योग व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी सहभागी झाले आहेत. याप्रसंगी शोधनिबंध पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. परिषदेचे निमंत्रक डॉ. एस. एस. पाटील, डॉ. एस. एस. शैळके, डॉ. व्ही. के. ठोंबरे, डॉ. जे. एम. शिंदे आदींसह संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित

# कोल्हापूरच्या कणखर लेकीचा सन्मान

## आश्रमशाळेतील अत्याचार उघड करणाऱ्या स.पो.नि.पल्लवी चव्हाण यांच्या शौर्याला सलाम

**कुरुंदवाड : कुलदीप कुंभार**

सांगली जिल्ह्यातील कुरळप येथील आश्रमशाळेतील संवेदनशील लैंगिक अत्याचाराचे प्रकरण अत्यंत धैर्याने उघडकीस आणून, त्याचा तपास यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक पल्लवी सुभाष चव्हाण यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकाने सन्मानित केले जाणार आहे. त्यांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

२०१८ साली,सांगली जिल्ह्यातील कुरळप पोलीस ठाण्यात सहायक निरीक्षक म्हणून कार्यरत असताना पल्लवी चव्हाण यांना एक निनावी पत्र प्राप्त झाले होते. यामध्ये, आश्रमशाळेतील इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचारचा प्रकार घडला होता. तक्रार करण्यास कोणीही धजावत नव्हते. मात्र, पल्लवी चव्हाण यांनी या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून, अत्यंत संवेदनशीलतेने आणि



कौशल्याने तपास सुरू केला.

त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि निर्भीड तपासामुळे, या प्रकरणातील दोन संशयितांविरुद्ध गुन्हा सिद्ध झाला. न्यायालयाने दोन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळाला आणि गुन्हेगारांवर वचक बसला.

कोल्हापूरची कन्या, शौर्याची मूर्ती पल्लवी चव्हाण या मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील आंबा (मानोली) येथील रहिवासी आहेत. त्यांच्या या विशेष कामगिरीसोबतच, त्यांनी इतरही अनेक गुन्ह्यांचा तपास यशस्वीपणे पूर्ण केला आहे. यापूर्वी, त्यांच्या उत्कृष्ट आणि धडाकेबाज कामगिरीसाठी त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस अधीक्षकांकडून ४७ हून अधिक बक्षिसे मिळाली आहेत. सध्या त्या मुंबई शहर येथे कार्यरत आहेत. केंद्रीय गृहमंत्र्यांचे दक्षता पदक जाहीर झाल्याने, पल्लवी चव्हाण यांच्या शौर्याची आणि कर्तव्यनिष्ठेची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्र पोलीस दलाची मान उंचावली आहे.

# निष्ठावंतांवर अन्याय होणार नाही : चंद्रकांत पाटील

**सांगली : हॅलो प्रभात**



सांगली महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप च्या मागच्या निवडणुकीत निवडून आलेल्या ४३ जागांवर आम्ही लढणार हे नक्की आहे.

पक्षात नव्याने आलेल्या आणि घटक पक्षातील उमेदवारांना पण हाच न्याय असेल. तेथे उमेदवार कोण द्यायचे हा निर्णय सर्व्हे नंतर मेरिट वर घेतला जाईल. उर्वरित जागांवर योग्य निर्णय चर्चा करून घेतला जाईल. त्यामुळे निष्ठावंतांवर कुठेही अन्याय होणार नाही अशी ठाम भूमिका पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना जाहीर केली.

आमची जिथे ताकद आहे तिथे आम्ही तडजोड करणार नाही. महापालिका क्षेत्रात आमच्या ४३ जागा आहेत तिथे तडजोड होणार नाही. जे जे आमच्या सोबत आलेले आहेत त्यांचे किती उमेदवार निवडून आलेले आहेत त्यानुसारच चर्चा करून व सर्वे नंतर तिकिटाचे वाटप होईल. कारण मधल्या आठ वर्षाच्या काळामध्ये ,मूळ नगरसेवकांपेक्षा इतर चांगले उमेदवार तयार झालेले असू शकतील. आरक्षण जाहीर झाले की सर्व्हे करून त्याचा आढावा घेऊनच, भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षांच्या उमेदवारांची नावे घोषित करता येतील.

याशिवाय एकदा सत्ता आली की सत्तेतील अनेक पदे असतात. असा खुलासाही त्यांनी केला. स्वीकृत नगरसेवक ,शिक्षण मंडळ, वृक्ष समिती, व राज्यातील विविध महामंडळाच्या नेमणुका बाकी आहेत.त्यामुळे त्या नेमणुकांमध्ये सुद्धा निष्ठावंतांवर अन्याय होणार नाही याची पक्ष योग्य ती खबरदारी घेईल याची खात्री कार्यकर्त्यांनी बाळगावी असेही पाटील यांनी नमूद केले.

# पेठ-गोळेवाडी ते सुरूल मुख्य रस्ता त्वरीत दुरूस्त करा

## भाजपा-रयत क्रांतीची निवेदनाद्वारे मागणी

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

वाळवा तालुक्यातील पेठ-गोळेवाडी ते सुरूल या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून, प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्याचे कामकाज नेहमीच निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. दरवेळी केवळ मलमपट्टी करून रस्ता चालू ठेवला जातो, त्यामुळे काही दिवसांतच तो पुन्हा खराब होतो, अशी नाराजी व्यक्त करण्यात आली.

या मार्गावरून गोळेवाडी, नायकलवाडी, ओझर्डे, घबकवाडी, सुरूल या पंचक्रोशीतील नागरिक आणि शालेय विद्यार्थी यांची सतत ये-



जा असते. मात्र, शासन आणि संबंधित विभाग रस्त्याच्या दुरुस्तीबाबत दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला.

या संदर्भात भाजपा-रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी इस्लामपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन रस्त्याची तात्काळ व दर्जेदार दुरुस्ती करण्याची मागणी केली.

यावेळी सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य अमोल पाटील, बजरंग कदम, राहूल पाटील, धनाजीराव इनामदार-पाटील यांच्यासह या विभागातील कार्यकर्ते व प्रवाशी वर्ग उपस्थित होते.

# विजय यमगर यांचा आर्यमॅन स्पर्धेत डंका

**ढालगाव : दत्तात्रय लोखंडे**

मलेशिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्यमॅन स्पर्धेत चोरोची गावचे इंजि. विजय यमगर यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ३.८ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२ किमी धावणे हे आव्हानात्मक अंतर फक्त १६ तास १५ मिनिटांत पूर्ण केले.

या अद्भुत कामगिरीने चोरोची गावासह संपूर्ण सांगली जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. विजय यांनी दाखवलेले धैर्य, चिकाटी आणि मेहनत यांचे सर्वत्र कौतुक होत असून, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुख्य चौकात वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त

## पूर्णवेळ वाहतूक पोलिसाची नेमणूक करण्याची मागणी

**सांगोला : विकास गंगणे**

येथील मुख्य चौकात म्हणजे कडलास नाका येथे गेल्या अनेक दिवसांपासून गंभीर वाहतूक कोंडी होत असून, नागरिक आणि वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.विशेषतः म्हणजे या चौकातून जत, पंढरपूर, अकलूज, सोलापूर, सांगली जाण्यासाठी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.परंतु या कडलास नाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. त्यामुळे प्रवासाचा वेळ वाढतो असून व्यापारी, शालेय विद्यार्थी, तसेच सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.



सांगोला तालुका एक प्रमुख डाळींब व्यापारी केंद्र, असून,सध्या पंढरपुर एकादशी वारी असून, भाविक गाडीमधून पंढरपुरला जात आहेत.येथे सकाळपासूनच मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढलेली असते. सांगोल्या मार्गे अकलूज, पुणे ,पंढरपुर सोलापूर तसेच लांब पल्ल्याच्या गाड्यांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर असते. तसेच ट्रॅक्टर, दुचाकी,चारचाकी आणि मालवाहतूक वाहनांमुळे मुख्य चौकात सतत गर्दी होत असते.याशिवाय, चुकीच्या पद्धतीने पार्किंग करणारे वाहनचालकही कोंडीत भर घालत आहेत.

वाहतूक नियमनासाठी सध्या पोलीस कर्मचाऱ्यांची पुरेशी उपस्थिती नसल्याने नागरिकांत नाराजी पसरली आहे. परंतू सांगोल्यात मुख्य नाक्यावर कायमस्वरूपी वाहतूक ट्राफीक पोलिसाची नेमणूक करावी,अशी मागणी स्थानिक नागरिक आणि व्यापारी वर्गाकडून जोर धरत आहे.

प्रशासनाने या वाढत्या वाहतूक समस्येकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# जांभळीत पक्षी निरीक्षण उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## उपक्रमात २५ पक्षांची नोंद

**इचलकरंजी : हॅलो प्रबहत**

जांभळी (ता. शिरोळ) येथे 'आम्ही जांभळीकर फाऊंडेशन' यांच्या वतीने ऑक्सिजन पार्क, येथे आयोजित पक्षी निरीक्षण उपक्रमास निसर्गप्रेमी, विद्यार्थी, पर्यावरण अभ्यासकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. निरीक्षणादरम्यान विविध प्रकारच्या सुमारे २५ हून अधिक पक्ष्यांची नोंद करण्यात आली. या उपक्रमात सुमारे २५ पक्षांची नोंद करण्यात आली. यावेळी पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष उमराणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक पक्षी अभ्यासक सर्वदमन कुलकर्णी (जयसिंगपूर) आणि प्रमोद कुंभार (अब्दुललाट) यांनी अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितांना विविध पक्ष्यांचा अधिवास, घरटी



बांधण्याच्या पद्धती, त्यांच्या राहणीमानातील वैशिष्ट्ये, तसेच पक्ष्यांच्या आवाजावरून त्यांची ओळख कशी करावी याबाबत माहिती दिली.

तसेच माळरानावरील परिसंस्थेचा आणि त्या ठिकाणच्या पक्ष्यांचा सखोल अभ्यास घडवून आणला.निरीक्षणादरम्यान विविध प्रकारच्या सुमारे २५ हून अधिक पक्ष्यांची नोंद करण्यात आली.

त्यामध्ये भिंगरी, तारवाली भिंगरी, बगळा, गाय बगळा, सूर्यपक्षी, राखी वटवट्या, तीतर, कावळा, कोतवाल, भारद्वाज, ग्रीन बी इटर, पिवळा धोबी (परीट), गप्पीदास, सायबेरियन गप्पीदास, लार्क चंडोल, ब्लिथचा वेळू वटवट्या, हुदहुद्या, व्होला, ठिपक्यादार मुनिया, दयाळ, बुलबुल, चिरक, खाटिक, टीटवी, नदी सुरई, सात भाई आदी पक्ष्यांचा समावेश आहे.

यावेळी थंडीच्या दिवसात परदेशातून आणि आसपासच्या प्रदेशातून आपल्या भागात स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांची विशेष नोंद पक्षी निरीक्षण करण्यात आली. ब्लिथचा वेळू वटवट्या हा परदेशी स्थलांतरित पक्षी प्रथमच दिसून आला. तसेच पिवळा धोबी (परीट) आणि राखी वटवट्या या दोन स्थानिक स्थलांतरित पक्षी यांचीही नोंद झाली.या निरीक्षण उपक्रमाद्वारे निसर्गप्रेमींना पक्षी जगताशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

यावेळी निसर्गप्रेमींनी विविध पक्ष्यांचे निरीक्षण केले. काहींनी पक्ष्यांचे छायाचित्रणही केले. पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष उमराणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अंगीभूत कौशल्यांना वाव देणारी शिक्षक-अधिकारी स्पर्धा

## दिगंबर काळे

**माढा : हॅलो प्रभात**

उपळाई (ता.माढा) येथे शिक्षकांच्या कार्यक्षमतेत वाढ करून शिक्षण क्षेत्रात नवे प्रयोग यशस्वी व्हावेत, यासाठी शासनाने शिक्षक अधिकारी स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेमुळे शिक्षकांच्या अंगीभूत कौशल्यांना वाव मिळून सर्वांगीण विकास साधता येईल,असे प्रतिपादन केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी केले.

उपळाई केंद्राच्या छत्रपती शिवाजी विद्यालयात आयोजित शिक्षण परिषदेत ते बोलत होते. बदलत्या शिक्षण प्रणालीत शिक्षकांनी स्वतःचा विकास घडवून आणत विद्यार्थ्यांना नव्या कल्पनांद्वारे मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे




त्यांनी सांगितले.

शासनाने राबविलेल्या या त्रेचाळीस प्रकारांतील स्पर्धा शिक्षकांच्या कौशल्य विकास, सहकार्य-संवर्धन, डिजिटल तसेच भावनिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरतील, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस माय सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिक्षण परिषदेचा शुभारंभ करण्यात आला. शिक्षक विठोबा गाडेकर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

पांडुरंग शिंदे यांनी स्पर्धेसाठी आवश्यक माहिती पुस्तिकेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले, तर धनाजी घाडगे यांनी लिंक भरण्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमास केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार अनिल काळे यांनी मानले.



# कुस्तीपटू हितेश पाटील यांचे राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णयश

## उझबेकिस्तान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड : खडकवासला तालमीचा अभिमान

**पुणे : प्रकाश यादव**

मधली तालीम येथे नियमित सराव करणारे कुस्तीपटू हितेश पाटील यांनी बेळगाव (कर्नाटक) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १२५ किलो गटात सुवर्णपदक पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे खडकवासला तालमीचा मान उंचावला आहे. या विजयामुळे हितेश पाटील यांची आगामी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी उझबेकिस्तान येथे २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश खडकवासला परिसरातील खेळाडूंना मोठी प्रेरणा देणारे ठरले आहे. मधली तालमीच्या वतीने पै राहुल मते पाटील यांच्या हस्ते पै हितेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विजय मते पाटील प्रसाद मते वस्ताद पै अमर मते पै सुनील मते, पै सुमीत पिंगळे सहकारी कुस्तीपटू आणि तालमीचे ज्येष्ठ सदस्य उपस्थित होते.

तालमीसाठी हा एक सुवर्ण क्षण असल्याचे मत राहुल मते यांनी व्यक्त केले.

# शिवप्रसाद फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबिर व चष्मे वाटप

**नातेपुते : हॅलो प्रभात**

शिवप्रसाद फाउंडेशन, श्री सद्गुरु शंकर महाराज अन्नछत्र समिती ट्रस्ट, पुणे आणि सेवासदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने माळशिरस येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर व मोफत चष्मे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम श्रीनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, शिक्षक कॉलनी, म्हसवड रोड, माळशिरस येथे पार पडला.




कार्यक्रमाचे उद्घाटन शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्या ऋतुजा मोरे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महालक्ष्मी पूजनाने करण्यात आले.

या शिबिरात हृदयरोग, डोळे, अस्थिरोग, स्त्रीरोग, किडनी, मधुमेह, त्वचारोग, कॅन्सर, कान-नाक-घसा तसेच मेंदू व मज्जातंतू विकारांसह विविध आजारांची मोफत तपासणी आणि शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच मोठ्या संख्येने नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

सेवासदन हॉस्पिटलच्या डॉ. लताताई मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. एकूण ४३० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमास शरद मोरे, ऋतुजा मोरे, डॉ. लता मोरे, नगराध्यक्ष विजय देशमुख, नगरसेवक रावसाहेब देशमुख, वैभव जानकर, उद्योजक हसन मुलाणी, अनिरुद्ध शिंगाडे, सामाजिक कार्यकर्ते बळीराम गेजगे, नानासाहेब हांडे, तसेच सेवासदन हॉस्पिटलचे डॉक्टर्स, शिवप्रसाद फाउंडेशनचे कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ; शेगाव दुमाला येथे भक्तनिवासाचे लोकार्पण

**पंढरपूर : हॅलो प्रभात**

वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीत येणारा वारकरी हा आमचा प्रथम व्हीआयपी आहे. संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री तथा आमदार तानाजी सावंत, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, संस्था प्रमुख दादा महाराज मोरे माऊली, स्वामी अमृता आश्रम महाराज, चकोर महास्वामी बाविस्कर, ह.भ.प. अक्षय भोसले महाराज, सरपंच सौ. जयलक्ष्मी माने व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

शासनाने मंदिरांच्या जतन व संवर्धनासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आषाढी दिंडी अनुदान, विमा योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. हे राज्य संतांची, वीरांची, शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. तसेच श्री संत मोरे परिवाराच्या वारकरी परंपरेच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, हे सरकार शेतकरी आणि वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात असलेल्या जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून जाण्याची आमची भूमिका आहे.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री संत मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन तर भक्तनिवास क्र. १ चे लोकार्पण रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन सोहळ्यामुळे शेगाव दुमाला गावात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले असून, वारकरी संप्रदायासाठी हे एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे.

# नाशिक व अमरावती जिल्ह्यांसाठी 'सी-ट्रिपल आयटी' मंजूर

## ना. अजित पवार यांच्या पुढाकाराला सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने आता नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांना प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग' म्हणजेच 'सी-ट्रिपल आयटी' केंद्र मंजूर करण्यात आले आहे. उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्याच्या प्रयत्नांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये सी-ट्रिपल आयटी उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. या पत्राला कंपनीकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, दोन्ही जिल्ह्यांसाठी 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रे स्थापन करण्यास टाटा टेक्नॉलॉजीने अधिकृत मान्यता दिली आहे.



या 'सीट्रिपलआय' सेंटरमुळे स्थानिक युवकांसाठी जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. या निर्णयामुळे उत्तर महाराष्ट्र (नाशिक) आणि विदर्भ (अमरावती) या दोनही भागातील युवकांना जागतिक दर्जाचे औद्योगिक प्रशिक्षण मिळण्याची दारे उघडली जाणार आहेत. त्याचबरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य, आवश्यक प्रशिक्षण यासारख्या संधी आपल्या जिल्ह्यातच उपलब्ध होतील. या केंद्रांमुळे स्थानिक पातळीवर उद्योगांना कुशल मनुष्यबळ सहज उपलब्ध होईल, नवउद्योगांना चालना मिळेल आणि स्वयंरोजगार व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रांमुळे औद्योगिक क्षेत्राला प्रशिक्षित, कुशल आणि तांत्रिकदृष्ट्या समर्थ युवक मिळतील, नवउद्योगांच्या स्थापनेस प्रोत्साहन मिळेल, स्थानिक अर्थव्यवस्था आणि उद्योगविकासाला बळकटी मिळेल, तसेच युवकांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल.

राज्यातील युवकांना रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करून ‌मेक इन महाराष्ट्र‌ या संकल्पनेला बळकटी देण्याचा उपक्रम म्हणून या दोन केंद्रांना मोठे महत्त्व आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील औद्योगिक जिल्ह्यांना कौशल्य विकासाचे नवे केंद्र बनविण्याचा संकल्प केला असून, या निर्णयामुळे त्या दिशेने एक ठोस पाऊल उचलले गेले आहे. या ‌सी-ट्रिपल आयटी‌ केंद्रांमधून विद्यार्थ्यांना आणि उद्योग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. 'रोबोटिक्स', 'इंटरनेट ऑफ थिंग्स,' 'डेटा अनालिटिक्स', 'इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञान', 'ऑटोमेशन' अशा अत्याधुनिक क्षेत्रांत युवकांना प्रशिक्षण मिळेल. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या पुढाकारातून नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांना मिळालेली 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रे ही राज्याच्या औद्योगिक आणि कौशल्य विकास क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरतील. या माध्यमातून 'कौशल्यसंपन्न महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने राज्याने आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे.

# दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण अधिक प्रभावी व्हावे : तुकाराम मुंढे

## दिव्यांग कल्याण आयुक्तांची कार्यपद्धती निश्चित

**मुंबई : हॅलो प्रभात**

दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, हक्क, सुरक्षा आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ७९ ते ८३ नुसार आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना राज्य आयुक्त म्हणून अधिसूचित करण्यात आले असून, त्यांना न्यायालयीन अधिकार बहाल करण्यात आले आहेत. राज्य आयुक्तांच्या चौकशी, तपासणी आणि कार्यवाही प्रक्रियेला अधिक सुसूत्र आणि परिणामकारक करण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.



सचिव श्री. मुंढे म्हणाले, राज्य आयुक्त स्वतःहून किंवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करू शकतात. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही किंवा निर्देश देण्याचा अधिकार त्यांना आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम च्या

कलम ८२ नुसार, राज्य आयुक्तांना दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. यामध्ये साक्षीदारांना समन्स पाठविणे, कागदपत्रे सादर करणे, शपथपत्रावर पुरावे स्वीकारणे तसेच तपासणीसाठी आयोग नेमण्याचे अधिकार समाविष्ट आहेत. त्यामुळे राज्य आयुक्तांसमोरील प्रत्येक कार्यवाही न्यायिक स्वरूपाची मानली जाईल.

राज्य आयुक्तांकडे दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक किंवा कायदेशीर प्रतिनिधी तक्रार दाखल करू शकतात. तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादीस नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मागवले जाईल. प्रतिवादीने १५ दिवसांत उत्तर सादर करावे लागेल, त्यानंतर ३० दिवसांत सुनावणी पूर्ण केली जाईल. सुनावणीसाठी दोन्ही पक्ष उपस्थित राहतील. सुनावणीसाठी प्रतिवादी उपस्थित राहिला नाही तर आयुक्तांना एकतर्फी निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

राज्य आयुक्तांच्या शिफारशींवर संबंधित प्राधिकरणाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे. शिफारशीवर केलेली कार्यवाही किंवा कारणासहित नकार अहवाल ९० दिवसांत राज्य आयुक्तांकडे सादर करावा लागेल. एखाद्या प्राधिकरणाने राज्य आयुक्तांची शिफारस नाकारल्यास आणि जर नकाराची कारणमीमांसा योग्य नसल्याचे आढळले, तर राज्य आयुक्त शासनाकडे अहवाल सादर करतील.

राज्य आयुक्तांनी मागितलेली आवश्यक माहिती व अनुपालन अहवाल सर्व अधिकारी, प्राधिकरी यांना सादर करणे बंधनकारक असेल. राज्य आयुक्तांच्या निर्देशांचे पालन न केल्यास, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ आणि कलम ९३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. त्यानंतर सुद्धा राज्य आयुक्तांच्या निर्देशाचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी, प्राधिकारी यांच्याविरुद्ध प्रशासकीय तसेच शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात येईल.

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**मुंबई : हॅलो प्रभात**

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे.

राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत आणि मुंबई शहर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील मदरसांनी या योजनेंतर्गत सुधारित प्रस्ताव सादर करण्यासाठी विहित अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह पूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करावे असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# माझी शाळा, सुंदर शाळा अभियान राबविण्यात येणार

## विशाल नरवाडे ; सर्वांनी मुदतीत जबाबदारी पूर्ण करावी

**सांगली : हॅलो प्रभात**

शासन निर्णयानुसार जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-३ अभियान दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ते ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना १०० टक्के सहभाग घेण्याबाबत सूचित करण्यात आले असून सर्वांनी मुदतीत आपली जबाबदारी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी सन २०२५-२६ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान नवनवीन उपक्रमांसह राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या सर्व माध्यमांच्या शाळांनी या अभियानात सहभागी होणे अपेक्षित आहे.



या अभियानासाठी शाळांची विभागणी ही शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व, उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा, महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्र अशा वर्गवारीत करण्यात आली आहे. दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी औपचारिक कार्यक्रमाव्दारे अभियानाची सुरूवात झाली असून अभियानाचा कालावधी दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण होणार आहे. दि. ०१ जानेवारी २०२६ ते दि. ०७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मूल्यांकनाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. त्यानंतर अभियानाचा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ संपन्न होणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

# महावितरणमधील विद्युत सहायक पदासाठी प्रतीक्षा यादी जाहीर

## दि. ६ व ७ ला कागदपत्रांची तपासणी

**मुंबई : हॅलो प्रभात**

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी नियमानुसार ५० टक्के मर्यादेत १८४७ उमेदवारांची प्रतीक्षा यादी www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर शुक्रवारी (दि. ३१) जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या परिमंडल कार्यालयांमध्ये दि. ६ व ७ नोव्हेंबरला करण्यात येणार आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये ५ हजार ३८१ विद्युत सहायक पदासाठी दि. २० ते २२ मे दरम्यान ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. त्यानंतर उमेदवारांची निवड यादी व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली.

या सर्व उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट व दि. ९ व १० सप्टेंबर दरम्यान पाच दिवसांत करण्यात आली.

निवड यादीतील उमेदवारांच्या प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणनिहाय अपात्रता, गैरहजर व इतर कारणांचा विचार करून कंपनी नियमानुसार जाहिरात केलेल्या पदाच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत दि. ३१ ऑक्टोबरला प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली आहे. तथापि दिव्यांग प्रवर्गाची निवड प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत 'परिस्थिती जैसे थे' ठेवण्याचा आदेश दि. १०/९/२०२५ ला दिव्यांग कल्याण आयुक्त यांनी दिला आहे. त्यानुसार या प्रतीक्षा यादीमध्ये दिव्यांग प्रवर्ग वगळण्यात आला आहे.

# गडकरींची खदखद आली बाहेर!

## म्हणाले, 'मी'च शिव्या का खाऊ?

**मुंबई : हॅलो प्रभात**

रस्ते बांधकाम आणि त्यातील गुणवत्ता याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्ली येथील एका कार्यक्रमात अत्यंत परखड आणि कठोर विधान केले आहे. महामार्गांच्या बांधकामातील निकृष्टतेबद्दल जनतेच्या रोषाला आणि माध्यमांवरील टीकेला (शिव्यांना) फक्त आपल्यालाच का सामोरे जावे लागते, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर, त्यांनी आता देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गांवर क्यूआर कोड असलेले मोठे होर्डिंग्ज लावण्याचे आदेश दिले आहेत.



नितीन गडकरी यांनी सार्वजनिक कार्यक्रमात भाषण करताना आपली भूमिका स्पष्ट केली. रस्त्यांमध्ये खड्डे पडल्यास समाज माध्यमांवर आणि पत्रकार फक्त माझा फोटो छापतात आणि मलाच टीकेला सामोरे जावे लागते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, मी एकटाच का शिव्या खाऊ? खराब रस्त्यांसाठी कंत्राटदाराचा फोटो, सल्लागाराचा फोटो आणि सचिवासह कार्यकारी अभियंत्यांचा फोटोही छापला जावा. त्यांच्यावरही टीका व्हायला हवी. सगळे माझ्याच गळ्याला का लटकतात? सोशल मिडियावर मीच का उत्तर देत बसू? त्यामुळे आता ही सर्व माहिती जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय मी घेतला आहे.

# दिव्यांग बाल नाट्य स्पर्धांचे राज्य शासनामार्फत आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

सन २०२५-२६ या वर्षासाठीची बालनाट्य व दिव्यांग बाल नाट्य या दोन्ही स्पर्धा सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या मार्फतच आयोजित करण्यात येणार आहेत. या दोन्ही स्पर्धांमध्ये कोणत्याही शासन बाह्य संस्थांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप नाही. ही शासन आयोजित स्पर्धा असल्याने संचालनालय त्याचे आयोजन करत आहे. या स्पर्धा आयोजनाची संपूर्ण जबाबदारी कोणत्याही एका संस्थेस देण्यात आलेली नाही. स्थानिक आयोजनातील सहकार्य आणि स्थानिक समन्वय यासाठी मात्र संचालनालय विविध संस्थांचे सहकार्य घेत असते, त्यापैकीच बालरंगभूमी ही एक संस्था आहे. सांस्कृतिक कार्यक्रम असो की नाट्य स्पर्धांच्या आयोजनात स्थानिक सहकार्य करणाऱ्या कलाक्षेत्रातील किंवा नाट्य क्षेत्रातील संस्थांचे सहकार्य नेहमीच सांस्कृतिक कार्य संचालनालय घेत असते. बालरंगभूमी ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न शाखा असल्यामुळे, स्थानिक सहकार्य व समन्वयासाठी संचालनालयास सहकार्य करत असते.

# आयुर्वेदाचे धडे सहावी, आठवीच्या अभ्यासक्रमात

**पुणे : हॅलो प्रभात**

एनसीआरटीने आपल्या सहावीच्या आणि आठवीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचे धडे समाविष्ट केले आहेत. भारतीय विद्यार्थ्यांचा आरोग्य, पोषण आणि पर्यावरण याबाबत समतोल दृष्टीकोण निर्माण व्हावा यासाठी याचा समावेश करण्यात आला आहे. एनसीआरटीचे निर्देशक दिनेश प्रसाद सकलानी यांनी सांगितलं की, यामागे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक ज्ञानाबरोबरच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ याच्या व्याख्येची ओळख करून देणे हा उद्देश आहे.

सहावीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचे मूळ सिद्धांताची ओळख करून देण्यात येईल, तर आठवीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातून दिनचर्या, ऋतूनुसार जीवनशैली यासारख्या विषयांची माहिती देण्यात येणार आहे. या बदलामुळं विज्ञानाच्या पुस्तकाला फक्त नव रूप येणार नाही तर विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक वैज्ञानिक माहिती आणि आयुर्वेदाची समज वाढवण्यासाठी देखील मदत होणार आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार आयुर्वेदाचा समावेश शालेय पाठ्यपुस्तकात केल्यानंतर आता उच्च शिक्षणातदेखील याचा समावेश करण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. एनसीआरटीच्या नव्या विज्ञानाच्या पुस्तकात आयुर्वेदाच्या वैज्ञानिक सिद्धांताची भाषा सोपी ठेवण्यात आली आहे. सहावीच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचे २० विरोधी गुणांच्या बाबतीत माहिती देण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना संपूर्ण आरोग्याच्या मुलभूत गोष्टींची समज निर्माण होईल. आठवीच्या विद्यार्थांना आयुर्वेदाच्या माध्यमातून शरीर, मन आणि पर्यावरण यांचे संतुलन याबाबत माहिती मिळणार आहे. त्यात दैनंदिन आरोग्याच्या सवयी, कोणत्या ऋतूत काय खाल्लं पाहिजे हे शकवण्यावर भर दिला जाईल.

युजीसी आणि आयुष मंत्रालय कॉलेज आणि विद्यापीठातील पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचा समावेश करण्यासाठी एक मॉड्युल तयार करत आहेत. आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी लोपॅथी आणि आयुर्वेदिक पद्धती या एकमेकांना पुरक आहेत. याद्वारे एकीकृत आरोग्य सेवा मॉडेल विकसीत करण्याचा उद्येश आहे. यामुळं कॉलेज स्तरावर आयुर्वेदाचा विस्तार हा विद्यार्थ्यांना पारंपरिक ज्ञानाशी जोडणे आणि आयुर्वेदाला जागतिक मान्यता देण्यासाठी केंद्राच्या प्रयत्नांना मदत होईल. असे सांगीतले.

हा बदल राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मूळ संकल्पनेतला आहे. यात शिक्षण आणि भारतीय ज्ञान तंत्रज्ञान यांना एकत्रित केले जाईल. विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचा समावेश केल्यानं या प्राचीन ज्ञानाचा सन्मान वाढेल. यामुळं विद्यार्थी हे आरोग्याच्या प्रती जागरूक होण्यास आणि सजग नागरिक तयार होण्यास मदत होईल.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ मंगळवार, ०४ नोव्हेंबर २०२५






# कोपरगावची कन्या होणार पोलीस उपाधीक्षक

## जिद्दीला आई व भावाच्या कष्टाची जोड : एम.पी.एस.एस परीक्षेत मिळविले घवघवीत यश

**कोपरगाव : विनोद जवरे**

मनाशी जिद्द, भविष्याचे ध्येय परिस्थितीची जाण उराशी बाळगत लाल दिव्याच्या गाडीने फिरायचं या ध्येयाने झपाटून अभ्यास करत अखेर आपल्या कष्टाच्या जोरावर नुकत्याच महाराष्ट्र शासनाच्या लोकसेवा आयोगाच्या जाहीर झालेल्या निकालात कोपरगाव येथील नगरपालिका महिला सफाई कर्मचाऱ्याची मुलगी तसेच रस्त्यावर चप्पल शिवण्याचा व्यवसाय करणाऱ्या भावाची बहीण १५ वा क्रमांक मिळवत उत्तीर्ण झाल्याने तिच्यावर मोठ्या प्रमाणात अभिनंदनचा वर्षा होत आहे.

नुकत्याच एम.पी. एस.सी परीक्षेत घवघवीत यश मिळवलेली कोपरगाव शहरातील उषा गंगाधर पवार हिने आपले कोपरगाव नगरपालिकेच्या शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण करत आपल्या वडिलांचे छत्र गमावल्यानंतर आपले आई व भाऊ यांचे दिवस-रात्र करत असलेल्या कष्टाची जाण डोळ्यासमोर ठेवत महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून पुणे येथील एका अभ्यासकेंद्रात प्रवेश घेत केंद्राचे संचालक दिलीप खाटे यांच्या मार्गदर्शनाखाली म हाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू करत तहानभूक, घरचे नातेवाईकांचे



शुभकार्य, सणवार, तसेच कुटुंबापासून अनेक वर्ष दूर राहत अत्यंत जिद्दीने उपजिल्हाधिकारी सौरभ रंगाटे, अजय शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा दिली व गुरुवारी जाहीर झालेल्या त्या परीक्षेच्या निकालात ५०८.५० गुण तसेच तोंडी परीक्षेत ६५ गुण मिळवत १५ वा क्रमांक मिळून यश मिळवल्याचे समजताच संपूर्ण कोपरगाव शहरासह सुभाषनगर परिसरात दुसऱ्यादा दिवाळी साजरी झाली तिचा या यशामुळे ती कोपरगाव तालुक्यातील किंबहुना संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिली महिला पोलीस उपाधीक्षक होऊ शकते. त्यामुळे नक्कीच कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ही गौरवास्पद बाब आहे.

आमचे कुटुंब पूर्णपणे निरक्षर असल्याने आम्हाला यातील काहीच कळत नाही परंतु माझ्या ताईने मिळवलेले हे यश आमच्या सर्व कुटुंबाच्या पुण्याईचे व तिच्या अहोरात्र कष्टाचे फळ आहे.

**– ज्ञानेश्वर पवार**
**(उषा पवार यांचा भाऊ)**

माझ्या घरची परिस्थिती अत्यंत बिकट आहे माझ्या आईने व भावाने मला १०-१० रुपये करून शिक्षणासाठी पैसे पुरवले तर मी देखील पुणे येथील जेवणाच्या मेस मध्ये भांडे घासत पैशाची गरज भागवली. त्यामुळे मी हे सांगू इच्छिते की आपल्या उराशी एक जिद्द असेल तर त्यावर आपण आपल्या परिस्थितीवर मात करत आपले ध्येय यशस्वीपणे गाठू शकतो मला यासाठी बहुमूल्य साथ मिळाली ती माझी आई व भाऊ मी यांचे उपकार जन्मभर विसरू शकणार नाही माझ्यासाठी साक्षात हे देवच आहे.

**– उषा पवार**

## ‘शरद’च्या विद्यार्थिनीची इंद्रधनुष्य स्पर्धेसाठी निवड

**जैनापूर : हॅलो प्रभात**

येथील शरद कृषी महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. राजल पटेल हिने ललित कला विभागातील पोस्टर या प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. नुकत्याच महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथे इंद्रधनुष्य २०२५ च्या निवड चाचणी संपन्न झाल्या. तिची विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

२१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ युवक महोत्सव इंद्रधनुष्य २०२५ या स्पर्धा दिनांक ५ व ९ नोव्हेंबर या कालावधीमध्ये कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर म हाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे स्पर्धा होणार आहेत. निवड



झाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन आमदार डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे, राहुरी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी विलास आवारे यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सारिका कोळी, उपप्राचार्य प्रा. संजय फलके, संघ व्यवस्थापक प्रा. दादासाहेब मगदूम व पूजा भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रभाकर मालंडकर यांचे निधन

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

गावभाग येथील प्रभाकर विठ्ठल मालंडकर (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.



## माझ्या जडणघडणीत देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजचा मोलाचा वाटा : ना.राजेश क्षीरसागर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

माझ्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि जडणघडण देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्येच झाली. या महाविद्यालयाने मला केवळ शिक्षणच दिले नाही, तर आत्म विश्वास, शिस्त, सामाजिक भान आणि नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी दिली. आज मी महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहे, त्यामागे माझ्या महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार नामदार राजेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.ते देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित, माजी विद्यार्थी ऋणानुबंध स्नेहमेळाव्यात प्रमुख पाहुणे आणि माजी विद्यार्थी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशन संस्थेचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. पुढे राजेश क्षीरसागर म्हणाले, महाविद्यालयात व्यतीत केलेला काळ माझ्या आयुष्यातील सुवर्णकाळ होता. इथेच मी



घडलो, वाढलो, आणि जीवनम ूल्यांची शिदोरी मिळवली. त्या ऋणातूनच मी महाविद्यालयाला दहा लाख रुपयांची देणगी अर्पण करतो.

कार्यक्रमात बोलताना डॉ. विश्वनाथ मगदूम म्हणाले की, संस्थेच्या सर्व महाविद्यालयांनी नवीन शिक्षण धोरणानुसार गुणवत्तापूर्ण आणि सर्वांगीण प्रगती साधली आहे. कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, आरोग्य या क्षेत्रांसोबतच विदेशी भाषा आणि योग यासारख्या नव्या विषयांतही शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे.माजी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाला एक लाख रुपयांची देणगी दिली. त्यांनी या रकमेच्या व्याजातून दरवर्षी आदर्श विद्यार्थी उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी सांगितले की, १९५७ मध्ये स्थापन झालेले आपले महाविद्यालय हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले वाणिज्य शिक्षण देणारे महाविद्यालय आहे. सीए फाउंडेशन, सेंटर ऑफ एक्सलन्स, प्लेसमेंट सेल, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे, बीबीए आणि एमबीए कोर्सेस या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण दिले जाते. आज कोल्हापूर जिल्ह्यातील ७०% पेक्षा जास्त चार्टर्ड अकाउंटंट हे आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.याप्रसंगी डॉ. एस. बी. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगते व्यक्त केली. माजी विद्यार्थी संघाचे सचिव प्रमोद जगताप, अनिरुद्ध भुरके, मनिष झंवर, फटाले आणि इतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले आणि पुढील माजी विद्यार्थी मेळावा डिसेंबर २०२६ मध्ये घेण्याचे ठरले. या कार्यक्रमाला कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम, डॉ. प्रसाद मगदूम, ड. वैभव पेडणेकर, ड. अमित बाडकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे प्राचार्य उत्तम पाटील, सौ. पार्वतीदेवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य डॉ. भालचंद्र कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. आर. एस. नाईक, एस. जे. फराकटे, प्रा. वंडकर तसेच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, फोटोपूजन आणि संस्थागीताने झाली. दुसऱ्या सत्रात माजी विद्यार्थ्यांच्या मनोगतांबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम तर तिसऱ्या सत्रात कलाविष्कार सादर झाले. सूत्रसंचालन डॉ. राज बिरजे यांन केले, तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.सुप्रिया चौगुले यांनी मानले.

## दौंड तालुक्यात अवैध बायो डिझेलची विक्री जोमाने सुरू

### विक्रेत्यांना अभय कोणाचे? वरकमाईमुळे कर्तव्यही खुंटीला टांगल्याचे चित्र

**दौंड : हॅलो प्रभात**




दौंड तालुक्यातील तमाम नागरिकांसाठी आणि वाहन मालिकांसाठी एक अत्यंत गंभीर समस्या मी आपल्यासमोर आणत आहे. माझ्या माहितीप्रमाणे व एका गुप्त सुत्राने दिलेल्या माहितीनुसार आपल्या दौंड तालुक्यातील काही सार्वजनिक पेट्रोल पंपांवर बायो डीझेल ची सर्रास बेकायदेशीर विक्री सुरू आहे. या अवैध विक्रीमुळे होणारे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. दौंड तालुक्यात दिवसाढवळ्या अवैध विक्री सुरू झाली असून महसूल व प्रशासनाच्या वरकमाईमुळे कर्तव्यही खुंटीला टांगल्याचे चित्र आहे. अवैध बायोडिझेल विक्रीचा विषय तालुक्यात चर्चेत असताना संबंधित अधिकारी कारवाई का करीत नाहीत, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अवैध बायोडिझेल विक्रीला नेमके अभय कोणाचे, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. कायदा व सुव्यवस्था फक्त सर्वसामान्यांसाठी असते का ? एकेकाळी दौंड तालुक्यात कायद्याचे होते, अपराध्यांना कायद्याचा वचक होता, पण वरकमाईच्या लालसेपोटी दौंड तालुक्याला अवैध धंद्याची राजधानी होण्याच्या मार्गावर नेऊन ठेवले आहे. तालुका प्रशासनाची खुली सूट असल्याने अवैध धंदे करणाऱ्यांना बळ मिळत आहे. कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करुन पेट्रोलपंपाचा व्यवसाय सुरू आहे. पेट्रोल - डिझेलच्या विक्रीमुळे होणाऱ्या व्यवहारात शासनाला मोठ्या प्रमाणात कर मिळतो, पण दौंड तालुक्यात सुरू असलेल्या अवैध बायोडिझेलच्या विक्रीमुळे येथील पंपचालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यामागे अधिकाऱ्यांचे अर्थकारण दडल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. काही नागरिकांच्या तक्रारीनंतर अवैध बायोडिझेलचा घोळ दैनिक हॅलो प्रभात वृत्तपत्राने चव्हाट्यावर आणला आहे. त्यामुळे हा प्रकार उघड झाला आहे. मात्र तालुका प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने या व्यावसायिकांना खुली सूट मिळाली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आता लक्ष घालतात का, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

मागील काही काही वर्षांपासून या डिझेल माफियांनी दौंड तालुक्यात लक्ष वळवले आहे. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी पेट्रोल पंपातील डिझेलची प्रामाणिकपणे तपासणी केल्यास हा प्रकार समोर येऊ शकतो पण तसे होताना दिसत नाही.

## एल्गार आंदोलनास यश ; ३० जूनपर्यंत शेतकरी कर्जमाफी

**राहुरी : हॅलो प्रभात**

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शेतकऱ्यांचा खरा नेता माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथील महा एल्गार आंदोलन यामुळे सरकार झुकलेला आहे . ३० जून २०२६ आत शेतकरी कर्जमाफी सह इतर मागण्या मान्य झालेले आहे. या आंदोलनाला खऱ्या अर्थाने यश आला आहे.या आंदोलनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील २००० अधिक दिव्यांग बांधव नागपूर येथील आंदोलनात सहभागी झाले त्यात प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांच्या नेतृत्वाखाली राहुरी तालुक्यातील ही २०० हून अधिक दिव्यांग बांधव या आंदोलन सहभागी होण्यासाठी राहुरी तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी वर्गणी करून आंदोलनात जाण्यासाठी आर्थिकनिधी उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे म नापासून आभार .यामध्ये राज्य



अध्यक्ष धर्मेंद्र सातव साहेब राज्य सचिव सुरेश मोकल साहेब राज्य संपर्कप्रमुख रामदास खोत राज्य उपाध्यक्ष लक्ष्मणराव पोकळे जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे महिला जिल्हाध्यक्ष लक्ष्मीताई देशमुख जिल्हा सल्लागार सलीम भाई शेख जिल्हा संपर्कप्रमुख पांडुरंग कासार तालुकाध्यक्ष योगेश लबडे ,तालुका सल्लागार बाबुराव शिंदे सर ,तालुका संघटक बाळासाहेब गांडळ , शाखाध्यक्ष माहेगाव भारत आढाव , मूकबधिर संघटनेचे तालुका अध्यक्ष वेनुनाथ आहेर, टाकळी येथील प्रगतशील शेतकरी प्रदीप भाऊ कड, तालुका सचिव रवींद्र भुजाडी, तालुका संघटक नानासाहेब खपके, देवळाली प्रवरा शहराध्यक्ष राजेंद्र सोनवणे माहेगाव येथील अमोल पवार यांनी ऊन , पाऊस चिखल गर्दी चक्काजाम ,उपासमार आपल्या जीवाची याची पर्वा न करता गर्दी त आंदोलनात मोलाचा सहभाग घेतला त्यामुळे बच्चू भाऊ चे नेतृत्वाखाली वरील मागण्यासाठी यश मिळालं त्याचा साक्षीदार होण्याचा मान मिळाला

काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला परंतु शेतकरी ओल्या दुष्काळाने ग्रस्त झालेला आहे त्यामुळे शेतकरी कर्जमाफी होणे गरजेचे होते ते यश बच्चुभाऊंच्या नेतृत्व खाली आलेले आहे त्यामुळे आम्ही सर्व बच्चुभाऊ सोबत आहोत आणि शेवटपर्यंत राहणार आहोत.

## विजय सेठींकडून तनपुरे कारखान्यासाठी एक कोटीची मुदत ठेव

**राहुरी : हॅलो प्रभात**

येथील डॉ.बाबुराव बाबुराव तनपुरे सहकारी साखर कारखाना हे आमचे कुटुंबिय आहे,आमचे बालपण येथे गेले या कारखाण्याचे गतवैभव आम्ही बघितले होते, गेलेले गतवैभव परत मिळावे अशी आमच्या वडिलांची इच्छा होती, म्हणून आज आम्ही एक कोटी रूपयांची मुदत ठेव देत आहोत,

आपण या कारखाण्याचे गतवैभव परत मिळवून द्या, आम्ही निस्वार्थ तुमच्या बरोबर आहोत,अशी भावनिक साद उद्योजक विजय सेठी यांनी घातली.राहुरी येथील उद्योजक विजय सेठी यांच्या निवासस्थावर डॉ. तनपुरे कारखान्या साठी कारखान्याचे अध्यक्ष अरूण तनपुरे यांच्याकडे एक कोटी रूपयांची मुदत ठेवीची धनादेश दिला. आमचे वडील येथे कपड्यानिशी आले होते, तनपुरे कुटुंबीय आमचे पालक होते, त्यामुळे या कारखान्याचे गतवैभव आम्ही बघितलेले आहे,मात्र आहे याची अवस्था बघुन खुप दुखः होते, म्हणून आम्ही भुमिपुत्राने मागितले नाही पाहीजे ,तर दिले देखील पाहीजे या भावनेतुन हा खारीचा वाटा उचलला असल्याचे सेठी यांनी सांगितले , प्रसंगी हा धनादेश स्विकारताना कारखान्या चे अध्यक्ष अरूण तनपुरे हे भावनिक झाले. राहुरीतील सर्वच उस उत्पादन शेक-यांच्या वतीने त्यांनी सेठी परीवराचे आभार मानले. प्रसंगी संजय सेठी, बादल सेठी, साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, जोगिंदर कथुरीया, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दिपक त्रिभुवन,ऋषभ लोढा,साई समाधानचे दत्तात्रय दरंदले,प्रशांत वाबळे,प्रकाश सोनी,डॉ.संदीप मुसमाडे,नंदू मोरे,रामेश्वर तोडमल,सुरेश नागपाल,अनिल इंगळे,रमेश दुधाडे,दत्तात्रय साळुंके,सतीश कुलकर्णी, कुंदन शर्मा,नितीन डमाळे,साई त्रिभुवन आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

## अफजलखान ‘वध शिल्पा’ संदर्भात मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक लावणार

### प्रतापगड प्राधिकरण समितीच्या बैठकीत खा.उदयनराजे भोसले यांचे आश्वासन

**सातारा : हॅलो प्रभात**

प्रतापगडच्या पायथ्याला छत्रपती शिवरायांनी अफजलखानाचा वध केला हा इतिहास शिवपराक्रमाचा साक्षीदार आहे .येथे अफजलखान वधाचे शिल्प लावले जावे ही शिवप्रेमींची भावना आहे या तीव्र भावना लक्षात घेऊनच या संदर्भात तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत बैठक लावली जाईल असे स्पष्ट आश्वासन प्रतापगड प्राधिकरण समितीचे अध्यक्ष तथा भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी हिंदू एकटा आंदोलन समितीच्या सदस्यांना दिले .प्रतापगड प्राधिकरण समितीची बैठक जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या दालनामध्ये पार पाडली .या बैठकीला दूरदृष्टी प्रणालीद्वारे पालकमंत्री शंभूराज देसाई,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजनउपवनसंरक्षक अमोल सातपुते,प्रांत योगेश खरमाटे,तहसीलदार सचिन मस्के,पुरातत्त्व विभागाचे संचालक विलास वाहने,अशासकीय समितीचे सदस्य नितीन शिंदे, मिलिंद एकबोटे, शरद पोंक्षे, सदाशिव टेंटविलकर ,सोमनाथ धुमाळ,



चंद्रकांत पाटील, विजय नायडू इत्यादी यावेळी उपस्थित होते .प्रतापगड प्राधिकरण समितीच्या बैठकीमध्ये राज्य शासनाने दिलेल्या १२७ कोटी रुपयांच्या विकास कामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रतापगड किल्ला जतन संवर्धन निविदा मान्यता या संदर्भातील प्रशासकीय मंजुरी घेऊन याबाबत निविदा काढणे आराखड्यातील उर्वरित काम ांची परिपुर्तता विद्युत सुविधा प्रतापगडच्या पायथ्याला प्रशस्त पार्किंग तयार करणे इत्यादी कामांचा आढावा घेण्यात आला प्रतापगड देवस्थानच्या जमिनी आहेत तेथे मोठ्या प्रमाणावर वनराई आहे तेथे वृक्षतोड झाल्यास पुन्हा वृक्षारोपण करून हा परिसर पर्यावरण समृद्ध करणे तसेच विकास कामांसाठी गरज पडल्यास प्राधिकरण मान्यतेने जमीन वर्ग करणे याबाबत खासदार उदयनराजे भोसले यांनी समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी दिली .

हिंदू एकता आंदोलन समितीच्या वतीने प्रतापगडावर अफजलखानवादाचे शिल्प येत्या २७ नोव्हेंबर पर्यंत बसवले गेले नाही तर आम्ही सातारा सांगली कोल्हापूर या तीन जिल्ह्यातील शिवप्रेमी प्रतिशिल्प वाजत गाजत नेऊन प्रतापगड पायथ्याला बसवू असा इशारा देण्यात आला होता याबाबत नितीन शिंदे यांनी तब्बल २४ वर्ष पाठपुरावा केलेला आहे .या संदर्भात राज्य शासन विविध स्वरूपाची कारणे देत आहे त्यामुळे आंदोलक आंदोलनाच्या पवित्रत आहेत अशा तीव्र भावना त्यांनी व्यक्त केल्या यासंदर्भात उदयनराजे भोसले यांनी शिंदे व मिलिंद एकबोटे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तारीख घेऊन तातडीने बैठक घेऊ असे आश्वासन दिले .